# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. १७/१२/२००५

आज दि. १७/१२/२००५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. १० दि. ०८/१२/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे | सभापती, स्थायी समिती |
| ४) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सभागृह नेता |
| ५) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| ६) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सभापती, महिला बालकल्याण |
| ७) | श्रीम. उर्मिला कोमल भामरे | उप-सभापती, महिला बालकल्याण |
| ८) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ९) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सदस्य |
| १०) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ११) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| १२) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| १३) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| १४) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १५) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १६) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १७) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १८) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १९) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| २०) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| २१) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| २२) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| २३) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २४) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २५) | श्री. नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| २६) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | सदस्य |
| २७) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २८) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २९) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| ३०) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| ३१) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३२) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३३) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३४) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ३५) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ३६) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ३७) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३८) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ३९) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ४०) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ४१) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४२) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | सदस्या |
| ४३) | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | सदस्या |
| ४४) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ४५) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४६) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सदस्य |
| ४७) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | प्रथम महापौर |
| ४८) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ४९) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ५०) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ५१) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ५२) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ५३) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| ५४) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ५५) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| ५६) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ५७) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ५८) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ५९) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ६०) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ६१) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| ६२) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ६३) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ६४) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ६५) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ६६) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ६७) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ६८) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ६९) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ७०) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |
| ७१) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ७२) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| २) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| ३) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| ४) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ५) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |
| ६) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ७) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ८) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |

## रजेचा अर्ज दिलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| २) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| ३) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सदस्य |
| ४) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |

**मा. महापौर :-**

दि. १७।१२।२००५ ची मा. महासभा. नमस्कार. मिरा-भाईंदरच्या प्रथम महिला महापौर सौ. मायराजी मेन्डोंसा मॅडम, उपस्थित असलेले आयुक्त श्री. सुदामरावजी गायकवाड साहेब, माजी सभापती मोहनजी पाटील, सभागृह नेता हॅरलजी बोर्जीस सर्व गटनेते, सभागृहात उपस्थित असलेले सभापती, नगरसेवक, नगरसेविका, प्रभाग समितीचे अध्यक्ष, तसेच, महानगरपालिकेचे सचिव हरेश पाटील साहेब, सर्व अधिकारी वर्ग,उपायुक्त, गॅलरीत उपस्थित असलेले प्रेक्षक, बंधु आणि भगिनी, सर्व पत्रकार बंधु. मिरा भाईंदर महानगरपालिकेत नुकत्याच चार समितीचे गठन झाले व या समितीमध्ये सभापती पदाची नियूक्ती करण्यात आली व ह्या सभापती पदी श्री. रोहीदास आ. पाटील, गलिच्छ वस्ती निर्मूलन समिती सभापती पदाकरिता श्री. चिंतामण पाटीलजी, शिक्षण समितीच्या सभापती पदासाठी श्रीम. हेलन जॉर्ज गोविंद, क्रिडा समाजकल्याण सांस्कृतिक समिती सभापती पदी श्रीम. अनिता पाटील ह्यांची निवड झाली. या सर्वांचे अभिनंदन. मिरा भाईंदर शहरातील सर्व ख्रिस्ती बांधवाना नाताळ सणाच्या हार्दिक शुभेच्छा. तसेच २००५ वर्षाची थोडयाच दिवसात सांगता होणार आहे या वर्षात निसर्गाच्या अनेक प्रलयकारी प्रसंगांना सामोरे जावे लागले. परंतु, मनुष्य हा नानाविविध संकटांना न डगमगता सामोरे जाण्याचा प्रयत्न करत आहे. २००५ या वर्षाला अलविदा करून येणाऱ्या २००६ या नूतन वर्षाचे स्वागत करू या. येणारे नूतन वर्ष सर्वांना सूख, समृद्धीचे, भरभराटीचे व आरोग्यदायी जावो हिच ईश्वर चरणी प्रार्थना! केंद्रीय कृषी मंत्री आदरणीय नेते राष्ट्रवादीचे शरदचंद्रजी पवार साहेब हयांची बी.सी.सी.आय. क्रिकेट बोर्डवर अध्यक्षपदी निवड झाल्या बद्दल त्यांचे ही अभिनंदन. आजच्या मा. महासभेवरील विषयाबाबत चर्चा अंती निर्णय घेउन सदरची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी. सर्व सन्मा. सदस्यांकडून सहकार्याची अपेक्षा धन्यवाद.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छितो की, आमच्या पक्षाचे राजकीय अध्यक्ष श्री. शरदचंद्रजी पवार साहेब तसेच, भारतीय जनता पार्टीचे श्री. गोपीनाथ मुंडे साहेब, कॉंग्रेस आय पक्षाच्या अध्यक्षा श्रीम. सोनीयाजी गांधी ह्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना हार्दिक शुभेच्छा. तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त श्री सुदामरावजी गायकवाड साहेब ह्यांचा सुद्धा वाढदिवस काल होता. ह्या सगळ्यांचे अभिष्टचिंतन तसेच त्यांना दिर्घायुष्य लाभो ही सभागृहाच्या वतीने ईश्वरचरणी प्रार्थना. असा मी वाढदिवसाच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**मोहन पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. ७१ :-**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राजकीय अध्यक्ष श्री. शरदचंद्रजी पवार साहेब तसेच, भारतीय जनता पार्टीचे श्री. गोपीनाथ मुंडे साहेब, कॉंग्रेस आय पक्षाच्या अध्यक्षा श्रीम. सोनीयाजी गांधी ह्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना हार्दिक शुभेच्छा. तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त श्री सुदामरावजी गायकवाड साहेब ह्यांचा सुद्धा दि. १६/१२/२००५ रोजी वाढदिवस होता. ह्या सगळ्यांचे अभिष्टचिंतन, तसेच त्यांना दिर्घायुष्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**सुचक :- ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**एस. ए. खान :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छितो की, मिरारोड विभागीय कार्यालयामध्ये घरपट्टीचे बील वाटण्यात आले आहे. मिरारोड कार्यालयामध्ये हाउस टॅक्स भरण्याकरीता भरपूर गर्दी आहे. तिथे जे लिपीक ट्रान्सफर करण्यात आलेले आहेत ते तिथे आलेले नाहीत. तिथे लिपिक कमी आहे. तर जो एक कोटी रूपयाचा चेक आलेला आहे त्याचे अजूनपर्यंत रिसीट फाडलेले नाही. दररोज सोसायटीचे लोक, पदाधिकारी चकरा मारून जातात. तर माझी कमिशनर साहेबांना विनंती आहे की, तिथे जास्त सेवेमध्ये लिपिक वगैरे जे देण्यात यावे. मिरारोड येथील नागरिकांची जी गैरसोय होत आहे, ती टाळावी.

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, चेना वरसावे कार्यालयामध्ये लिपिक नसल्यामुळे कर भरणा होत नाही. म्हणून चेना येथे सुद्धा लिपिकाची व्यवस्था करण्यात यावी.

**नितीन ठाकूर :-**

मा. महापौर मॅडम, आता जे सन्मा. सदस्य एस. के. खान. साहेबांना सांगितले मी, मिरारोड विभागीय कार्यालयामध्ये जे रहिवाशी हाउस टॅक्स भरण्याकरिता येतात. त्यांना उन्हामध्ये तीन-तीन, चार-चार तास उभे राहावे लागते. कृपया आपण तिथे शेड्सची व्यवस्था करावी . अशी मी आपल्याला विनंती करतो.

**एस. ए. खान :-**

याबाबत मी पत्र दिलेले आहे. लवकरच कार्यवाही होईल असे सांगण्यात आलेले आहे.

**रोहीदास पाटील :-**

साधारण मा. महापौर मॅडमच्या लक्षात आले असेल की, टॅक्स वसुली, टॅक्स भरणा लोक भरत आहेत आणि महापालिकेच्या वतीने टॅक्स घेण्यामध्ये दिरंगाई होत आहे किंवा गैरसोय होते. आमची सामुदायिक अशी मागणी आहे की, ज्या ज्या ठिकाणी कॅश काऊंटर आहे त्या त्या कॅश काऊंटरवर आपण वेगवेगळ्या खात्यातील वेगवेगळी माणसे ताबडतोब डेप्युट करायला पाहिजे की, लोकांची गैरसोय न होता लोकांची मोठी लाईन न लागता लोक सुलभतेने पैसे भरू शकतील. कदाचित त्या लाईनमध्ये चोरी झाली, काय झाले हे तुम्ही ऐकणार नाही. तो माणूस लांब, बंदरवाडी शाळेच्या रस्त्याच्या पलीकडे लाईन जाते. शेडस्ही नाही आणि सुरक्षितता नाही. रिक्षांचे ट्रॅफिक चालू आहे. या शाळेच्या समोर आपण कंपाउन्ड ग्रील लावा. तर ते ग्रील ही लागत नाही. आयुक्त साहेब, आपण आमची विनँी ऐकली का? बंदरवाडी शाळेतील एक विशेष परिस्थिती मी तुमच्या समोर ठेवतोय. ती लाईन रस्त्यावर जाते. रिक्षा, एस.टी., पॉकीटमार सर्व तिथे चालू आहे. त्या दृष्टीने तिथे काऊंटर एकच्या ऐवजी अनेक म्हणजे तिथे माणसे बसायला व्यवस्था करायला पाहिजे. हे लक्षात घ्या.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छितो की, सभा सुरू असताना सर्व सदस्यांना आपले प्रश्न मांडायचे असतात आणि अत्यंत महत्वाचे ते प्रश्न आहेत. असा वेळ महोदया आपण द्यायला पाहिजे असे माझे मत आहे. तर आपण सभा सुरू होत असताना एखादा विषय झाल्यानंतर आपण सर्व सदस्यांना जे निकडचे प्रश्न असतील त्यावर त्यांना प्रश्न मांडण्याकरीता संधी द्यावी आणि माझ्या माहिती प्रमाणे प्रशासन मा. महापौरांच्या आदेशान्वये या मिरा-भाईंदर महानगरपालिकेमध्ये असे टॅक्स भरण्याकरिता जी गर्दी होते आणि जी अडचण निर्माण होते त्याकरीता बँकेमार्फत त्याचे देयक आपण देऊ शकतो. अशा पद्धतीची पद्धत प्रशासनाकडून सुरू झाली, म्हणजे जेणेकरून ज्या आपल्या विभागामध्ये ज्या नॅशनल बॅक (राष्ट्रीयकृत बँक) असेल त्या ठिकाणी आपण आपले चेक ,आपले देयक देउ शकतो. आपण चेक द्वारा अशी पद्धत सुरू केलेली आहे आणि सर्व भाईंदर पुर्व, पश्चिम, मिरारोड या सर्व ठिकाणी ही पद्धत सुरू करावी. जेणे करून आपले जे प्रभाग कार्यालय आहे त्या ठिकाणी तो ताण पडणार नाही आणि नागरिकांना पैसे भरण्यास, कर भरण्यास सोईचे होईल.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, हमारे २१ नगरसेवक थे। हमारे पक्ष मे माजी उपनगराध्यक्ष मा. अशोक पाटीलजी और सन्मा. सदस्या श्रीम. संगिता म्हात्रे इन दोनो का कॉंग्रेस आय पक्ष मे समावेश हुआ है। इसलिए मै कॉंग्रेस पक्षकी तरफ से इनका अभिनंदन करता हूँ।

**मुक्ता रांजणकर :-**

सदर ठरावाला माझे अनूमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. ७२ :-**

माजी उपनगराध्यक्ष श्री. अशोक पाटील आणि सन्मा. सदस्या श्रीम. संगिता म्हात्रे यांचा कॉंग्रेस पक्षामध्ये समावेश झाल्याबद्दल ही सभा त्यांचे अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्री. हंसुकुमार पांडे.** **अनुमोदन :- श्रीम. मुक्ता रांजणकर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, गंभीर विषय आहे. गेले दिड महीने झाले. नवघरच्या पूर्व बाजूस घोडबंदरकडे जाणारा रस्ता, तिथे पाईप लाईन प्रचंड प्रमाणात लिकेज आहेत की, त्याच्यामुळे तिथे तलाव भरलेले आहेत ते पाणी लोकांनाही मिळत नाही आणि त्या पाण्याचे आपण एम.जी.पी.ला बील भरणार आहोत. ते नक्की कोणी भरायचे? गेले दिड महिने झाले पाणी प्रचंड प्रमाणात वाहत आहे. आपण जर जाउन पाहिले तर तिथे तलाव झालेले आहेत. शहरातल्या लोकांना पाणी मिळत नाही, हवे त्या प्रमाणामध्ये तरी त्याचा खुलासा संबंधित अधिकाऱ्यांनी करावा. ते एम.जी.पी.ने करायचे की, स्टेमने करायचे की, महापालिकेने करायचे? आणि ह्या

सगळ्यांच्या भानगडीमध्ये तिथे प्रचंड पाण्याचा निचरा होत आहे. मॅडम आपण ह्याचा संबंधित अधिकाऱ्याला खुलासा करायला सांगा.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, सन्मा. सदस्य जयंत पाटील ह्यांनी जो पाण्याचा विषय काढला. घोडबंदर येथे व नवघरच्या मधे जी पाईप लाईन तुटलेली आहे, त्याच्याविषयी अभियंता श्री. शिवाजी बारकुंड ह्यांना सांगितले होते. आणि त्यांनी सांगीतले की, ताबडतोब माणसे पाठवून देतो आणि रिपेअरिंग करून घेतो. तसेच, पाण्याच्या टाकीवर असलेल्या लोकांना वॉर्नीग दिली होती आणि जवळजवळ ह्याला दिड महिना झाला आहे व तिचे तलाव झालेले आहे. इथे लोकांना प्यायला पाणी नाही तर ते कोणी करायचे? त्यांचे ही म्हणणे आहे की, करावं कोणी? ते केलेले आहे की , नाही हे तरी सभागृहाला सांगावे

**शिवाजी बारकुंड :-**

मा. महापौर मॅडम, या संदर्भात स्टेमचे अधिकारी श्री. नांदूरकर साहेब आणि श्री. कोसे साहेब ह्यांच्याशी मी प्रत्यक्षात बोललो त्यांना स्पॉट दाखवला आणि ते उद्याच शटडाउन घेणार आहेत आणि उद्याच्या उद्या काम करणार आहेत.

**जयंत पाटील :-**

पाण्याचे बिल ते भरणार आहेत का? जे पाणी वाया गेले त्याचे बिल कोण भरणार? आपण भरणार आहोत ना. आपल्याकडे डिझॉस्टर मॅनेजमेंट नाही आहे का?

**शिवाजी बारकूंड :-**

हे स्टेमचे काम आहे. स्टेमला दाखवलेले आहे आणि ते उद्या स्टेमचे काम चालू करणार आहेत.

**जयंत पाटील :-**

आपतकालीन व्यवस्था आपल्याकडे आहे का नाही? जर उद्या मेन पाईप लाईन तुटली आणि स्टेम येईपर्यंत दिड महिना जर जाणार असेल तर ते नुकसान कोणी सहन करायचे? आणि लोकांचा पाणीपूरवठा कोणी बघायचा? आपल्याकडे आपत्कालीन व्यवस्था आहे की नाही?

**शिवाजी बारकूंड :-**

थोडया प्रमाणात लिकेज आहे. ते त्यांनी बघितले. त्यांना दाखवले आणि उद्या काम चालू करणार आहेत.

**जयंत पाटील :-**

बारकुंड साहेब, ह्याला जर थोड्या प्रमाणात म्हणत असाल, तर मग मोठ्या प्रमाणात तुमचे काय प्रमाण आहे?

**मा. महापौर :-**

सचिवजी, आपण सभेच्या कामकाजाला सुरूवात करावी.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सभेला सुरूवात झालेली आहे. कृपया इतिवृत्तांत मंजूर करून घ्यावे. त्याच्यानंतर प्रश्नोत्तराच्या तासानंतर सदस्यांचे जे प्रश्न असतील त्याला उत्तर द्यावे

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम या ठिकाणी पक्षांतर झाले म्हणून अभिनंदनाचा ठराव मांडला. तो एका पक्षाच्या आघाडीचे सहा सदस्य होते. त्यापैकी दोघे आले. तर पक्ष उत्पलबंदी काय ते त्यांना लागू होतो की, नाही. नियमानूसार त्यांना आपण पक्षांतर दिलेले आहे का? ते त्या पक्षामध्ये बसलेले आहे. ते नियमाप्रमाणे आहे की नाही, त्याची माहिती द्यावी.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, आज जे दोन आघाडींच्या नगरसेवकांनी कॉंग्रेस पक्षामध्ये प्रवेश केलेला आहे आणि आता सन्मा. सदस्य प्रकाश दुबोले साहेब बोलले की, हे नियमात बसते की नाही. तर नियमात बसल्याशिवाय ते येथे बसूच शकत नाहीत. ह्याचा संपूर्ण अभ्यास करूनच त्यांनी या येथे प्रवेश केलेला आहे. अभ्यास केला नसता तर ते येथे बसले नसते. अभ्यास करून बसलेले आहेत. नियमात बसलेले आहेत. ह्यांना कसल्याही प्रकारची अडचण येणार नाही.

**प्रकाश दुबोले :-**

अभ्यास तुम्ही केला. आम्ही सभागृहामध्ये विचारतो की, सभागृहाते त्यांना परवानगी दिलेली आहे का? कॉंग्रेस पक्षामध्ये बसायला. अभ्यास तुम्ही केला असेल येथे तुमची परिक्षा नाही.

**प्र. सचिव :-**

प्रश्नोत्तराच्या तासाला सुरूवात करण्यात येत आहे. ११.४०मि. झालेले आहेत. श्री. ओमप्रकाश अग्रवाल ह्यांचा प्रश्न होता. सन्मा. सदस्य गैरहजर दिसत आहेत. त्यामुळे पुढील प्रश्न सन्मा. सदस्या श्रीम. नयना गजानन म्हात्रे ह्यांचा होता व त्यांनी तो प्रश्न माघारी घेतला आहे. पुढचा प्रश्न सन्मा. सदस्य ओमप्रकाश

गारोडीया यांचा आहे. ह्या प्रश्नाला देखील ते सभागृहात गैरहजर आहेत. पुढचा प्रश्न सन्मा. सदस्या रिटा सुभाष शाह यांनी विचारलेला आहे.

**अनंत म्हात्रे :-**

मा. महापौर महोदया, सन्मा. सदस्या नयना गजानन म्हात्रे ह्यांनी जो प्रश्न आपल्याला विचारलेला आहे, तो कुठल्या वॉर्डाचा आहे?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी पत्रव्यवहार केलेला आहे.

**अनंत पाटील :-**

कसला पत्रव्यवहार केलेला आहे? आणि कोणा कोणाच्या काय तक्रारी होत्या?

**प्र. सचिव :-**

त्यांनी प्रश्न मागे घेतलेला आहे.

**अनंत पाटील :-**

आम्हाला मागे घेतलेले पत्र वाचून दाखवा. पत्र वाचायला कसली हरकत आहे?

(प्र. सचिवांनी सन्मा. सदस्या श्रीम. नयना म्हात्रे ह्यांच्या पत्राचे वाचन केले.)

**प्र. सचिव :-**

वरील विषयानुसार मुर्धा येथील शाळेत इमारत बांधण्यासाठी त्यांनी प्रश्न विचारला होता. त्यांच्या प्रश्नावर प्रशासन मुर्धा येथील शाळा इमारतीला मंजूरी घेउन, निविदा मागवून ठेकेदाराला आदेश दिलेले आहेत. त्यामुळे सदरचा प्रश्न वगळावा अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

**रिटा शाह :-**

मॅडम, सदर गोविंदनगर प्रिमायसेसला भरपूर वर्ष झालेले आहे. परंतु, ह्यांना आपल्याकडे परमिशने दिलेली आहे. पण गोविंदनगर जी बिल्डिंग आहे त्यांनी जे कागदपत्र आपल्याकडे जोडलेले आहेत ते सर्व बोगस आणि फ्रॉड आहेत. तेव्हा श्री. धेनगावे साहेब होते, मी त्यांना विचारले होते त्यांनी मला तोंडी बोलले होते. पण नंतर मला लेखी उत्तर मिळाले नाही. आता येथे नविन साहेब आलेले आहेत, श्री. घेवारे साहेब. त्यांनी जर याबाबत कल्पना दिली तर बरे होईल.

**श्री. घेवारे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छितो की, गोंविद नगर जी सोसायटी आहे तिथे पाणी पुरवठा देण्यासाठी आमच्यामडे अर्ज प्राप्त झाले होते. त्यासोबत त्यांनी जे पेपर्स दिले होते, त्याची नोंद, परवानगी, किंवा भोगवटा दाखला असे आढळत नाही. त्यामूळे सदर पेपर्स खोटे आहेत अशी आमची खात्री झालेली आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, त्यांनी जे कागदपत्र आपल्याकडे जोडलेले आहेत. त्याची आपल्याकडे कुठेही नोंद नाही. तेव्हा पण मला हा जवाब मिळाला होता. ॲक्चूअली त्यांचे सर्व कागद फ्रॉड आहेत. आपण त्याच्यावर पोलीस गुन्हा नोंदवलेला आहे का?

**श्री. घेवारे :-**

मिरारोड पोलीस स्टेशनमध्ये जुन, २००३ रोजी आपण फिर्याद दिलेली होती. त्याच्यानंतर त्याच्यावर पूढे काही फॉलोअप न झाल्यामुळे. ज्यावेळेस आपला प्रश्न आम्ही बघितला.

**रिटा शाह :-**

माझ्या प्रश्नाला दोन वर्ष झाले आणि तक्रार करून किती वर्ष झाली ते कार्यालयाला माहित. आपले प्रशासन जर असे चाललं तर मागे पोरवाल बिल्डर ह्यांनी पण आपले असेच वाटोळे केले. आता हा नविन बिल्डर म्हणजे त्याने जे काही कागदपत्रे तुमच्याकडे लावलेले आहे, ते सर्व फॉल्स आहे.

**श्री. घेवारे :-**

मिरारोड पोलीस स्टेशनने आम्हाला दोन वर्षाने कळवले आहे. १७ नोव्हेंबरला त्यांनी असे पत्र दिलेले आहे की, हा गुन्हा भाईंदर पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडल्यामुळे त्यांच्याकडे गुन्हा नोंदवा. म्हणून परवा २ डिसेंबरला त्यांच्याकडे पुन्हा फिर्याद नोंदवलेली आहे.

**रिटा शाह :-**

ते ठिक आहे. आपण परवा काहीतरी केले ते चांगलेच केले आहे. काहीतरी मुहूर्त निघाला. दोन वर्ष झाली या प्रश्नाला. तर मुहूर्त झाला नव्हता. कारण आपण येऊन आता परवाच्या दिवसाला कम्पलेंट केली ते ठिक आहे. मग आपल्या पुढचे जे होते त्यांना माहित नाही का, कुठल्या परिसराचा प्रश्न आहे आणि कुठे जाउन तक्रार करायची? जेव्हा तुम्ही तिथे तक्रार केली तेव्हाचे ऑफीसर कनकिया पोलीस स्टेशन की मिरारोड पोलीस स्टेशन, काशीमीरा . तेव्हा त्यांनी सांगितले नाही का? ही केस आम्ही आमच्या कडे घेणार नाही. तुम्ही भाईंदरला जा

**मा. आयुक्त :-**

तेव्हा सांगितले असते तर तेव्हाच तसे केले असते.

**रिटा शाह :-**

साहेब, तेच सांगते ना. तेव्हा त्यांनी सांगितले नाही. ह्याचा अर्थ त्यांनी ती तक्रार घेतली म्हणजे ते ऑफिशियल झाले. मग कुठल्या पोलीस स्टेशनने ॲक्शन घेतली ते महत्वाचे नसते. ॲक्शन घेणे महत्वाचे असते आणि त्याच्यावर फॉलोअप करणे महत्वाचे असते. आपल्याकडे कोणी काय फॉलोअप केला? डिपार्टमध्ये माणसे बदलत राहतात. पण त्यानंतर आपल्याकडे काय फॉलोअप केला प्रश्न जसेच्या तसाच पडलेला आहे. मला वाटते मी चौथ्यांदा पण निवडून येणार तेव्हा विचारणार की गोंविदनगरचे काय झाले?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्या पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केल्यानंतर त्या तक्रारीच्या बाबतीमध्ये त्यांच्याकडून जर आपल्याला फार उशीरा पत्र आलेले असेल तर त्या पत्राची दखल घेउन आपण तातडीने त्याच्यावर कार्यवाही केलेली आहे.

**रिटा शाहः-**

ठिक आहे. त्यांनी जे कागदपत्र आपल्याकडे सादर केलेले आहे...

**रोहीदास पाटील :-**

साहेब, पोलीस स्टेशन हे कोणत्या हद्दीत आहे, हे महापालिकेच्या अधिकाऱ्यांना माहित नसेल तर ह्या विषयाचे गांभीर्य तरी काय? म्हणजे ह्याच्या हेतूबद्दलच शंका येते ना. जेव्हा भाईंदर पश्चिम पोलीस स्टेशनची हद्द हे महापालिकेच्या अधिकाऱ्यांना माहिती असायला पाहिजे. कारण ह्या हद्दीतला गुन्हा त्या पोलीस स्टेशनमध्ये नोंदवायचा आणि वर्ष, दोन वर्षांनंतर मग सांगायचे की, दोन ओळींचे आम्हाला पत्र द्या की, हे आमच्या हद्दीत नाही. मग परत आम्ही नोंदतो. ही कोणती पद्धत? साहेब सत्य लपवून काही फायदा होत नाही. जसे तुम्ही प्रशासकीय मध्ये निरंक लिहिले, तुम्ही हायकोर्टात गेले. हायकोर्टात निवेदन केले काही माहिती नाही. तूम्हाला घन कचऱ्याच्या नोटीसा आल्या. तूमची धावाधाव झाली. गटनेत्याला बोलावले. सभागृहाला काही माहिती नाही. आमची एवढीच विनंती आहे की, जे होते आहे त्या सगळया पाप-पूण्याला आम्ही सभागृह तयार आहोत. माहिती तर द्याल की नाही? आता परत पुन्हा पुन्हा उल्हासनगर निघेल उल्हासनगर नंतर भाईंदरचा विषय निघणार आहे. आपली महापालिका, महापालिकेच्या आधीचे काय, हे सोडून द्या पण महापालिका स्थापन झाल्यानंतर सत्ताधारी पक्ष सत्तेत आल्यानंतर काय चालले आहे, ह्याचीतरी माहिती व्हायला पाहिजे की, नाही. साहेब, ह्यांच्यामध्ये लोकांची फसवणुक होते.

**रिटा शाह :-**

साहेब, महत्वाचा आहे, ठिक आहे. पोलीस स्टेशनने काय केले आणि काय नाही केले, ते त्यांचे शासन चालवणारे बघणार? परंतू, मिरा भाईंदर महानगरपालिकेचा ए.टी.पी. डिपार्टमेंटने दोन वर्ष त्याचावर काय कार्यवाही केली? श्री. घेवारे साहेब हे नुकतेच आलेले आहेत त्याच्या अगोदर जे साहेब होते.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम की आज्ञा से बोलता हूँ की, यह जो विषय है वह मिरारोड का है। और यह विषय जभी धनेगावे साहब थे, कमिशनर साहब थे। वह पेपर का सब पुरावा मैं ही लेकर आया था। वह जो कमिशनर साहब का साईन था वह भी बोगस था और पुलिस केस किया था। श्री. किरण गोसावी साहब के पास केस था। पर पुलिसने कुछ भी कारवाई नही की थी। पुलिस स्टेशन मे केस किया था उसकी कॉपी मेरे पास मौजुद है। अपने प्रशासन ने पुलिस मे केस तो किया लेकिन कार्यवाही कुछ भी नही हुआ।

**रिटा शाह :-**

अध्यक्ष साहेब, आपले कमिशनर साहेब असू दे की, कोणी पण असू द्या. कोणाचीही सही करणे एक आम पब्लिकने फ्रॉड सही करणे म्हणजे किती गंभीर गुन्हा आहे. उद्या तुमच्या मंजूरीची आणि तुमच्या साईनची आम्हाला गरजच लागणार नाही कुठल्या कागदावर. बाहेरूनच सगळे मंजुर होणार.

**चंद्रकांत मोदी :-**

वॉटर डिपार्टमेंटने से कनेक्शन दे दिया था। श्री. धनेगावे साहब ने बोला था की कनेक्शन नही दिया जाएगा। लेकिन उनको कलेक्शन दिया गया है। तभी श्री. कांबळे साहेब यहा थे उनके हातो से कनेक्शन दिया था।

**रिटा शाह :-**

काही नाहीतर, त्यांचे कनेक्शन ताबडतोब कट करा.

**चंद्रकांत मोदी :-**

हमारे साथ उस वक्त सन्मा. सदस्य खान साहब थे, वह मौजूद थे। उनको यह पूरा विषय मालूम था। इसका बहूत हंगामा हुआ था।

**श्री. घेवारे :-**

ही जी सोसायटी आहे ती मिरारोड हद्दीमध्ये आहे. म्हणून आपण तिथे गुन्हा दाखल केला होता.

**रिटा शाह :-**

साहेब, मी काय बोलते आपण कुठे काय गुन्हा दाखल केला आहे ते आपण विसरून जा. पण ऑफीशियली मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आपण रूलिंग आहात ना. तुम्ही प्रशासन आणि आम्ही शासन.

मग आपण मिळून तेवढे तरी करू शकतो ना. त्यांचे जे कागदपत्र जोडलेले आहेत ते सर्व खोटे आहेत. ते आपण स्वतःच सांगतो. असे उत्तर ही आपण दिलेले आहे. मग त्यांना वॉटर कनेक्शन कुठल्या बेसवर दिले? ते कनक्शन ताबडतोब कट करा आणि त्या सोसायटीजवळ बोर्ड मारा की, ही टोटली इललिगल बिल्डींग आहे आणि त्यांच्यावर असे असे गुन्हे नोंदवलेले आहेत असे तिथे बोर्ड लावा

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्या गोविंद नगरचे आपण जे सभागृहाच्या निदशर्नास आणून दिलेले आहे. त्याप्रमाणे त्यांना जे कनेक्शन दिलेले आहे, ते २००१ साली कनेक्शन दिलेले आहे. आपण जो हा प्रश्न विचारलेला आहे त्या प्रश्नामध्ये जे काही गांभीर्य आहे. त्या गांभीर्याचा विचार करून त्यांचे कनेक्शन ताबडतोब कट करण्याचे मी आदेश देतो.

**रिटा शाह :-**

ते कनेक्शन आपण कट करा. तो तुमचा अधिकार आहे आणि ते कनेक्शन कट करणार असा मला विश्वासही आहे. कारण आम्ही श्री. नाईक साहेबांचे पण रुप बघितले आहे आणि आम्ही असे ऐकले आहे की, आपण नाईक साहेबांच्या लेव्हलचे आहात. त्यांच्या बरोबरीचे आहात. श्री. नाईक साहेबांनी पण ते पॉवर दाखवलेले आहेत. आमच्या बोलण्यावरून त्यांनी दुसऱ्या दिवशी जाउन नउ कनेक्शन कोणाचेही न बघता कापले होते. तेव्हाही धन्यवाद केले होते आणि आजही धन्यवाद देते. तुमच्यावर देखील आम्ही तोच विश्वास ठेवतो. पण साहेब, उल्हासनगर असू दे की, भाईंदर असू दे. इललिगल कुठे नाही. इललिगल करणे हे मला वाटत नाही गंभीर गुन्हा आहे कारण संपूर्ण मुंबई मध्ये इललिगल बांधकाम आहे. परंतु, फ्रॉड कागदपत्र जोडून हा गुन्हा करणे, हे अति महत्वाचा गुन्हा आहे आणि त्याच्यावर आपण ॲक्शन घ्यावी आणि वॉटर कनेक्शन आपण किती दिवसामध्ये कट करणार आहात?

**मा. आयुक्त :-**

आठवडयाभरात.

**रिटा शाह :-**

आपण आठवडयाभरात करणार पण त्याच्या अगोदर ते कोर्टात जाउन स्टे घेउन येणार.

**मा. आयुक्त :-**

नाही. लगेच कार्यवाही करण्यात येईल.

**रिटा शाह :-**

ठिक आहे. कनेक्शन कट केले आणि तिथे एक बोर्ड लावा की, हे इललिगल बांधकाम आहे कायदेशीर कार्यवाही करून आठ दिवसात कनेक्शन कट करतो असे साहेबांनी सांगितले आहे.

**प्र. सचिव :-**

पुढचा प्रश्न आहे सन्मा. सदस्य केशव रामभाउ घरत सदस्य हे सभागृहात गैरहजर आहेत. प्रश्न क्र. ४१, रिटा सुभाष शाह यांचा आहे.

**रिटा शाह :-**

श्री. धनेगावे साहेबांबद्दल मी प्रश्न विचारलेला आहे आणि अति महत्वाचा प्रश्न आहे. कारण त्याच्यामध्ये जी टाईम लिमिट दाखवली आहे, नक्की त्या दोन तीन महिन्यात ते कुठे कामावर होते आणि त्यांना पगार कुठल्या पद्धतीने दिले आणि त्यांना पगार मिळाला की नाही? देत होता की नाही. ते सर्व महत्वाची गोष्ट नाही. परंतू, साहेब आपल्या येथे कामावर राहिले असते तर मी जास्त डिपमध्ये गेलेले बरे वाटले असते. पण आज धनेगावे साहेब आपल्या येथे कामावर नाहीत. ते येथून सोडून गेलेले आहेत. तर मला असे वाटते की, ते सर्व काढणे आणि हा सर्व इतिहास बघणे म्हणजे स्वतःच मी सांगते की हे सगळं बरे वाटत नाही. तरी पण आपण मंथन करायला पाहिजे की, धनेगावे साहेब कुठे गेले? मी त्यांचा रिस्पेक्ट आजही करते आणि काल ही करत होती. परंतु, जो पिरीयड लिमिट दाखवला आहे त्यावेळी ते नक्की कामावर होते की, नाही? ते महत्वाचे आहे. असेल तर मिरा-भाईंदरच्या लोकांना काहीच फरक पडत नाही. परंतू, त्या पिरीयडमध्ये ते कामावर नसतील तर त्यांनी त्या पिरीयडमध्ये ते ए.टी.पी. डिपार्टमेंटचे अधिकारी म्हणून केलेली साईन, सिगनेचर ती ऑथेन्टीक असेल किंवा नसेल. म्हणजे ती कायदेशीर मानली जाणार की नाही जाणार? फक्त मला तेवढ्याच प्रश्नाचे उत्तर पाहिजे की, त्या पिरीयडमध्ये त्यांनी जे नकाशे सॅक्शन केले ते कायदेशीर मानले जाणार का?

**श्री. घेवारे :-**

मॅडम, असे आहे की आपण जो पिरीयड दिलेल आहे. त्या पिरियडमध्ये त्यांची येथून बदली झाल्यानंतर , येईपर्यंत असे कुठलेही नकाशे किंवा रिपोर्ट साईन केलेले नाही. त्यामुळे ते ज्या दिवशी येथून गेले तेथून त्यांनी काम बंद केलेले आहे आणि ज्या दिवशी ऑडर घेउन आले त्यानंतर त्यांनी काम सूरू केलेले आहे आणि कुठलेही नकाशे किंवा परवानग्या.........

**रिटा शाह :-**

फक्त मी ते सांगत नाही. ते ठिक आहे. तुम्ही बोलणार आणि यु आर दि होल ॲन्ड सोल इन द ए.टी.पी. डिपार्टमेंट नाउ. आता आपण ए.टी.पी. डिपार्टमेंटचे अधिकारी आहे. मी जी टाईम लिमिट

त्याच्यामध्ये टाकलेली आहे. त्या दोन महिन्याच्या पिरीयडमध्ये ते नक्की कुठे कामावर होते. ते या येथे यायचे पण मला वाटते त्यांना सॅलरी देत नव्हते, तर त्यांना कशाला सॅलरी देत नव्हते आणि सॅलरी दिली नाही तर ते कामावर होते की नाही?

**श्री. घेवारे :-**

मधला जो पिरीयड आहे त्याची सॅलरी डायरेक्टर ऑफ टाउन प्लानिंगने त्यांना दिलेली आहे. कारण तो ऑर्डरचा मधला पिरियड आहे किंवा विदाउट पे होइल पण ते इथे जरी आले असतील तरी त्यांनी काम कुठे केले?

**रिटा शाह :-**

जी टाईम लिमिट दाखवली आहे. त्या टाईमावर ते ऑफिसमध्ये यायचे, बसायचे.

**श्री. घेवारे :-**

कुठलेही नकाशे किंवा ज्या परवानग्या आहेत त्याच्यावर आयुक्त साहेब सही करतात आणि त्यांचा एक रिपोर्ट असतो.

**मा.आयूक्त :-**

सन्मा. सदस्या, शासनाने त्यांचा जो कार्यकाल आहे तो कार्यकाल नियमित केलेला आहे. शासनाकडून तो कार्यकाल नियमित झालेला आहे. त्याप्रमाणे त्यांची जी काही कृती झालेली असेल ती सगळी नियमित झालेली आहे.

**रिटा शाह :-**

म्हणजे ती कृती व्हॅलीड मानली जाणार का?

**मा. आयूक्त :-**

होय.

**रिटा शाह :-**

धन्यवाद.

**मा. महापौर :-**

सचिवजी पुढील प्रश्नाला सुरूवात करावी.

**प्र. सचिव :-**

सन्मा. सदस्य चंद्रकांत मोदी ह्यांनी विचारलेला प्रश्न आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, हम तो इतनी विनंती करते है की, जो ऑफीसर अच्छा काम करके जाते है उनको लोग याद करते है, बुरा काम करता है उसको भी लोग अलग तरीके से याद करता है। हमारी सब ऑफीसर को विनंती करते है की, सब अच्छा काम करके जाए। आज इधर है और कल दुसरी जगह जाए। जैसे हमारे गायकवाड साहब कितना अच्छा काम करके आए है, हमारे दोस्त उधर जाते है तो वह देखकर खुश हो जाते है। हमारे गायकवाड साहब जैसा काम करके आए वैसे ऑफीसर काम करे ऐसी विनंती करता हूँ।

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय की, या विषय पत्रिकेवर सातच विषय घेतले आणि अजून विस मिनिटे बाकी आहेत. म्हणजे सभागृहामध्ये जसे विषयपत्रिकेवरील विषय चालू असले तरी अर्ध्या तासाला बेल मारता हा विषयपत्रिकेचा विषय पूर्ण चालवायला पाहिजे. आमचे विषय पेन्डींग आहेत ते का घेतले नाही?आपल्याला काही अडचण होती का?

**प्र. सचिव :-**

पुढचा विषय पुकारतो ना.

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न तो नाही. आता अजून वीस मिनिट बाकी आहेत. ११.४५ वा. प्रश्नोत्तराचा तास चालू झाला. आपण ११.४० टाईम दिले म्हणजे किती झाले? अजून टाईम किती बाकी आहे.,

**प्र. सचिव :-**

पुढचे प्रश्न मी घेतो ना.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, पण आमच्याकडे मटेरियल काहीच नाही. ही परिस्थिती आपल्यावर का येते? आम्ही का, सदस्य नाही का? या विषयपत्रिकेत जे प्रश्न आहेत ते अत्यंत जूने आहेत त्यातले तीन प्रश्न रिटर्न झाले, मागे घेतले गेले, ह्याची तुम्हाला कल्पना आहे. अधिकारी आपल्याकडून कामावरून निघून गेलेले आहेत. त्याला वर्ष-वर्ष झालेले आहे. त्यांचे प्रश्न आले आहेत. तो जो माझा पिरीयड आहे, त्याच्या मागचे आमचे प्रश्न आहेत. ते आपण का घेतले नाही?

**प्र.सचिव :-**

रेग्युलरप्रमाणे जसे सात प्रश्न असतात, तसेच.........

**मिलन म्हात्रे :-**

आपण मला सांगा ते प्रश्न चुकीचे होते का? नाही ना,एक प्रश्न मांडायचा आमचा अधिकार आहे, दुसरी गोष्ट अशी आहे की, पुढे प्रश्न असताना ते तुम्ही का घेतले नाही? ह्याची माहीती काहीच दिलेली नाही. बाकीचे दोन तीन प्रश्न असेच गेले.

**प्र. सचिव :-**

पुढचा प्रश्न घेत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सात प्रश्नापैकी चार प्रश्न असेच फुकट गेले आणि आता तुम्ही ते प्रश्न कसे घेणार? आमच्याकडे माहिती नाही, त्या प्रश्नाचे उत्तर नाही.

**प्र. सचिव :-**

आपण सांगत असाल तर पुढच्या वेळेला घेउ तेथून सुरुवात करू.

**मिलन म्हात्रे :-**

हे तर आम्हाला माहितीच आहे. मला असे सांगा की माझा प्रश्न चालू असताना मेयर बटन दाबून प्रश्नोत्तराचा तास संपवून टाकतात. बरोबर बेल वाजल्यावर. आता एक्सेस दहा पंधरा मिनिट बाकी आहेत, ह्याच्यात आपण काय करायचे? सगळे मिळून भजन करू या, चला.

**प्र. सचिव :-**

आपण सांगत असाल तर पुढच्या वेळी विषय घेतो.

**मिलन म्हात्रे :-**

आमचे पंधरा मिनिटे हक्काचे जातात त्याचे काय?

**रोहीदास पाटील :-**

पुढच्या मा. महासभेमध्ये पंधरा मिनिट जास्त द्या.

**मिलन म्हात्रे :-**

पुढच्या सभेमध्ये आम्हाला प्रत्येकाला पंधरा मिनिटे जास्त पाहिजेत. एक्सेस द्या.

**रोहीदास पाटील :-**

पुढच्या सभेमध्ये प्रश्नोत्तराचा तास अर्ध्या तासाऐवजी पंचेचाळीस मिनिटे करा.

**मिलन म्हात्रे :-**

हा आमचा हक्क आहे. नाहीतर आम्ही हक्क बंद आणतो.

**रोहीदास पाटील :-**

ही कमीटमेन्ट पुर्तता केलेली नाही.

**मिलिन म्हात्रे :-**

जर दहा प्रश्न जास्त ठेवले असते तर बिघडले असते का?

**मा. महापौर :-**

पुढच्या सभेमध्ये प्रश्नोत्तराच्या तासामध्ये दहा मिनिटे वाढवून देण्यात येईल.

**मिलन म्हात्रे :-**

मुद्दामहून आमच्या लोकांचे प्रश्न पुढे आहेत म्हणून ते मागे घ्यायचे.

**प्र. सचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने पुढच्या सभेत प्रश्न क्र. ४३, त्यासाठी दहा मिनिटे वाढवून देण्यात येतील.

**मिलन म्हात्रे :-**

पंधरा मिनिटे द्या. पाच मिनिटे कमी करू नका.

**प्र. सचिव :-**

मा. महापौर मॅडमनी दहा मिनिटे सांगितलेली आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

पंधरा मिनिटे वाढवून पाहिजे.

**मा. महापौर :-**

दहा मिनिट वाढवून देण्यात येतील.

**प्र. सचिव :-**

आजच्या सभेला आलेल्या रजेच्या अर्जाचे वाचन केले.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, मला काहीतरी बोलायचे आहे. माझे दोन प्रश्न शिल्लक आहेत. माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळले नाही एका प्रश्नामध्ये ते काम करणारेच आपल्याकडून निघून गेले. त्यामुळे जास्त वाद करणे महत्वाचे नसते. परंतू, मी प्रशासनाची बाजू घेत नाही. कारण आपण शासनवाले आहेत. विरोधी पक्ष असू की, रूलिंग पार्टी असू दे. सचिवजी, मी नेहमी बघितते की, विषयपत्रिकेमध्ये चार, पाच, सहा प्रश्न घेतात आणि एक एकदा असे वाटते की, होते की नाही. कारण एका प्रश्नाचे उत्तर मिळता मिळता अर्धा तास संपतो.

असा वेळ मी स्वतः घेतलेला आहे. माझ्या एका प्रश्नाला कमीत कमी पाच ते सहा सभा झालेल्या आहेत. पाचसहा वेळेपर्यंत माझ्या प्रश्नाचे उत्तर पूर्ण मिळालेले नव्हते. उत्तर देणारे थकले पण मी थकले नाही. हे मी स्वतः सांगते मला असे वाटते की, सचिव साहेब किंवा प्रशासन देव नाही की त्याला स्वप्न येणार की नगरसेवक त्यांचा प्रश्न हा पाच मिनिटामध्ये संपवणार की नगरसेवक येणार नाही. ते त्यांना स्वप्न पडत नाही म्हणून आपण ते बोलणे वाईट वाटते. कारण तुम्ही प्रशासन आहात व आम्ही शासन आहोत. तुमचे आम्ही सहभागी आहोत. तुम्ही केलेले आहे ते आम्ही केलेले आहे आणि आम्ही केलेले आहे ते तुम्ही केलेले आहे. म्हणजे कुठल्याही नगरसेवकाने त्याच्यामध्ये वाईट वाटून घेणे हे मला वाटत नाही की योग्य आहे. दहा मिनिट राहिली आहेत तर दहा मिनिटामध्ये चहा-नाश्ता आला आहे ते आपण करायचे.

**प्र. सचिव :-**

आजच्या सभेला श्री. लिओ कोलासो, श्रीम. प्रभात पाटील, श्रीम. भानू भगवान पाटील, श्री. ओमप्रकाश अग्रवाल ह्यांचा रजेचा अर्ज आलेला आहे.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ६९ चे वाचन केले.)

**रोहित सुवर्णा :-**

पान क्र. १० मध्ये आय.डी.बी.आय. पाहिजे. पान क्र. ९ वरून कन्टीन्यू परिच्छेद आणि तिथेच खाली मी बोलतो त्या ठिकाणी अलाऊड ऐवजी अलाव पाहिजे. पान क्र. १७ मध्ये वरून सहाव्या लाईनमध्ये गाईडसी ऐवजी गाईडलाईन्स पाहिजे आणि ज्या ज्या ठिकाणी एक्स ऑफीसर आहे तिथे एक्स ऑफिशो पाहिजे.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, सचिवजी पान क्र. २१ मध्ये जो ठराव लिहिलेला आहे. त्या ठरावामध्ये जी पद लिहिलेली आहेत, वाहतूक अधिकारी, सहा. वाहतूक अधिकारी यामध्ये माझ्या माहिती प्रमाणे प्रवर्तक हे बारा दाखविलेले आहेत आणि ठरावामध्ये लिहिताना सहा लिहिलेले आहेत. त्यामुळे बारा की सहा ते जरा क्लिअर करून घ्या. कारण प्रवर्तक बारा आहेत आणि टेंडरमध्ये सुद्धा तूम्ही बाराचीच संख्या दिली होती. तो आकडा चेक करावा.

**प्र. सचिव :-**

तो आकडा चेक करण्यात येईल.

**हॅरल बोर्जीस :-**

सचिव साहेब, पान क्र. २ मध्ये प्रथम महापौर मेन्डोसा मायरा गिल्बर्ट असे सदस्या म्हणून जे उल्लेख करतात. तर सन्मा. महापौर मॅडम अशी सूचना आहे की, त्यांच्या नावासमोर सदस्या ऐवजी प्रथम महापौर असा उल्लेख करावा.

(सन्मा. सभागृह नेते हॅरल बोर्जीस ह्यानी प्रकरण क्र. ६९ चा ठराव सभागृहासमोर मांडला.)

**परशुराम पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ६९ :-**

दि. २३/०८/२००५ रोजीचे मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ७३ :-**

दि. २३/०८/२००५ रोजीचे मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनूमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानूमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय, सन्मा. सभागृहाला माहिती द्यायची आहे की, आपल्याकडे श्री. अशोककुमार रणखांब जे उपायुक्त म्हणून कार्यरत होते. त्यांची बदली होउन त्याठिकाणी श्री. बालाजी खतगावकर हे उपायुक्त म्हणून रुजु झालेले आहे. दि. ०५/१२/०५ पासून कार्यरत झालेले आहेत.

**मिलन पाटील :-**

सभागृहासमोर उभे राहून त्यांनी ओळख करून द्यावी.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साो., उपस्थित सदस्य., उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, बंधू-भगिनिंनो मिरा भाईंदर महानगरपालिका येथे दि. ०५/१२/०५ पासून उपायुक्त या पदावर शासनाच्या आदेशाप्रमाणे मी रूजू झालेलो आहे. माझे संपूर्ण नाव बालाजी नामदेवराव खतगांवकर असे आहे. माझे

एज्युकेशन मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी येथून एम.एस.सी अग्रोनॉमि सॉइल ॲन्ड वॉटर मॅनेजमेंट येथे झालेले आहे. महाराष्ट्र शासनाच्या पब्लिक सर्व्हिस कमिशनमार्फत १९८७ बॅचचा मी नगरविकास विभागाचा अधिकारी झालेलो आहे. यापूर्वी या पदावर रूजू होण्यापूर्वी ठाणे महानगरपालिका येथे परिवहन व्यवस्थापक या पदावर मी कार्यरत होतो.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ७० चे वाचन केले)

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छितो की, छत्रपती शिवाजी मार्ग, काशीमिरा रोड येथे आपण जे रस्ते बंद करण्याचे घेतले आहे आणि तिथे आपण दिवाबत्ती लावणार आहोत,सिग्नल त्याचे काम सुरू करणार आहोत. मागच्या प्रोसीडींगमध्ये म्हणजे स्थायी समितीच्या सभेमध्ये ठराव क्र. ९० मध्ये अशा पद्धतीने आपण ज्या ठिकाणी सिग्नल लावणार आहात त्या ठिकाणावरून त्याचे अंतर किती असणार आहे? तिथे मधे राहणारे लोक आहेत. त्यांच्यासाठी आपण हे वाहनासाठी झाले पण त्या पब्लिकसाठी जर आपल्याला येणे-जाणे ह्या बाजूने त्या बाजूने जाणे. तिथे हॉस्पीटल आहे, त्याबाजूने धोका नाही त्यांच्यासाठी आपण काय सुविधा करणार आहात आणि ते कम से कम अर्धा, एक-एक किमामीटर सिग्नलचे अंतर आहे. तर त्याच्यासाठी आपण ओव्हरब्रीज बांधणार आहात का? त्याचा खुलासा करण्यात यावा.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी जो काही प्रश्न उपस्थित केलेला आहे त्या बाबतीमध्ये मी आपल्याला माहिती देतो की, ट्राफिक सिग्नलचे काही नियम आहेत आणि त्या नियमाप्रमाणे आपण त्याठिकाणी ट्राफिक सिग्नलची व्यवस्था करणार आहोत. आपण म्हणता त्याप्रमाणे ज्या ज्या ठिकाणी क्रॉसींग आहे आणि पटस्के वे ज्या ठिकाणी आहे. ज्या ठिकाणी पादचारी मार्ग असेल त्या ठिकाणी वेगळ्या पद्धतीच्या लाईटस लावून आणि त्याठीकाणी पांढरेपट्टे वगैरे देउन हे जे आता प्रचलित मुंबईला जाताना आपल्याला दिसते. त्याप्रमाणे आपण त्याठिकाणी व्यवस्था करणार आहोत.

**परशुराम पाटील :-**

पण किती किती अंतरावर पाहिजे? असा काही नियम आहे का?

**मा. आयुक्त :-**

ते जे अंतर आहे ते त्या ट्रॅफिक्स नियमाप्रमाणेच राहिल. ट्रॅफिकचे जे नियम शासनाने नक्की केलेले आहेत, मंजूर करून घेतलेले आहेत, दिलेले आहेत त्याप्रमाणेच त्याचे नॉर्म्स राहतील.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलू इच्छितो की, हा जो प्रकरण क्र.७० सभेसमोर आणलेले आहे. तर मघाशी प्रश्नोत्तराच्या विषयावर मी बोललो की, आपल्या मा. महासभेचे हे कामकाज संपूर्ण सेपरेट आहे. स्थायी समितीचे सभापती, जे काही तिथे स्थायी समितीला केलेले आहे. मूळ आपला मा. महासभेचा जो गोषवारा किंवा अजेन्डा असतो तो ह्या प्रकरण ७० बरोबर कुठेही दिलेला नाही. म्हणजे स्थायी समितीने जो ठराव केलेला आहे, तो माहितीकरिता त्यांनी द्यावा. आमचे काही ठराव ऑब्जेक्श्न नाही. पण स्थायी समितीमध्ये जे काही झाले असेल त्याचे मॉडीफिकेशन करण्याचे अधिकार आमच्या मा. महासभेच्या सर्व सदस्यांना आहे. ह्याचा सेपरेट तुमचा गोषवारा पाहीजे. स्थायी समितीला आलेली पत्रे, आपण पुढे निरंक लिाहिले आहे. परंतू, प्रकरणामध्ये मला चांगले आठवते, आर.टी.ओ.चा सर्वे झाला होता त्यावेळी मी स्थायी समितीला सदस्य होतो. त्यावेळेला आपण अनेक पत्रव्यवहार आर.टी.ओ.ला केलेला आहे. सगळ्या पत्रव्यवहाराला त्यांनी तुम्हाला मंजूरी दिलेली आहे असे नाही सिग्नल्स कुठे असावे? श्री. खैरनार नावाचे सब इन्सपेक्टर होते त्यांच्याबरोबर आम्ही जवळजवळ पंधरा दिवस सर्वे केलेला आहे. त्यांचे रिपोर्टस् आलेले आहेत. उद्या ह्या ठिकाणी आपण करा. मी म्हणत नाही ह्याच्या विरोधात मी आहे. कारण मी सुद्धा वाहन चालवितो, स्कुटर चालवतो, कार चालवतो. मला माहित आहे येथे अपघात कसे घडतात? परंतू, उद्या एखादे काय प्रकरण घडले आणि न्यायप्रविष्ठ झाले तर आपला हा स्यायी समितीचा ठराव म्हणजे ज्याला आपल्या मा. महासभेची कुठेही टिपणी नाही. गोषवारा नाही असा चूकीचा ठराव, हा जो पेपर दिला आहे, हा पूर्णपणे मा. महासभेकरीता ॲथेन्टीकेटेड नाही. कारण ह्याच्यावर कमिशनर साहेबांची कुठेही सही नाही. कूठे ही सचिव साहेबांची सही नाही. स्थायीचे प्रकरण आपण सगळं लावून दिलेले आहे. हा कागद जो लावला आहे प्रकरण क्र.७० चा हा मा. महासभेला विधीग्राह्य नाही असे माझे ठाम मत आहे. ह्याची रिसपॉन्सीबिलिटी कोण घेणार? सचिवांची सही नाही आणि तुमची ही सही नाही. एक चार ओळींचा गोषवारा आपण देउ शकत नाही का प्रत्येक विषयाला. दोन अडीचशे विषय नव्हते इतर महापालिकेमध्ये होतात तसे नव्हते. आप फक्त दोनच विषय होते. एक विस्तृत जर दिले गेले असते की, सिटी इंजिनिअर काय म्हणतात, आयुक्त साहेबांचे म्हणणे काय आहे? त्यानंतर तुमच्याकडे आर. टी. ओ चे काय मत आले आहे? नागरिकांच्या काय तक्रारी आहेत ते मला चांगले माहिती आहे. ह्याच्यावर तुमच्याकडे भरपूर पत्रव्यवहार झालेला आहे. आमच्या नगरसेवकांना ह्यातील काहीच माहिती नाही आणि प्रशासनाने शॉर्टकट एक कागद दिलेला आहे. हा संपूर्णपणे चुकीचा विषय आणला आहे. हा विषय पुढच्या सभेला ठेवा. हा महत्वाचा विषय आहे. ह्याच्यावरती अनेक लोकांचे जीव गेलेले आहेत. उद्या, मानवी हक्काकडे जर एखादे प्रकरण गेले तर हे सगळं प्रकरण बाहेर येईल,

आयुक्त साहेब आणि फक्त एक पत्र येईल स्थायी समितीचा ठराव आहे ते मान्य आहे पण ह्या सभेचा ॲथोन्टीकेटेक व्हु इज ही? जो कोणी असेल त्याची ह्या प्रकरणावर सही आहे का? ह्याच्यावर कोणाची सही नाही. फक्त वर लिहीले आहे प्रकरण ७० करिता विषय संपला. हे माझ्या मताने संपूर्ण चूकीचे आहे. मा. महासभेचे कुठलेही डॉक्यूमेंट ह्याच्यावर अँथोन्टीकेटेड नाही. कुठल्याही अधिकाऱ्याची सही नाही. हा विषय तुम्ही पूर्णपणे पत्रासोबत आर. टी. ओ. चे जे काही अहवाल आलेले आहेत, ते मला माहिती आहेत. स्थायी समितीला संपूर्ण झालेले आहे आणि वीस विषय आहेत. वीस ठिकाणी तूम्हाला बंद करायचे आहेत आणि आपल्याकडे असे करत असताना तुमच्याकडे पुर्ण मध्यमार्ग तुम्ही केलेला आहे. आपण जर दुभाजक बंद केले तर लोकांना यायला जायला प्रॉब्लेम होईल. रस्त्यामध्ये कुठेही ग्रील नाहीत. त्यामुळे लोक राहिलेल्या झाडावरून उड्या मारून येणार आहेत. आणि तिथे अपघात व्हायचे तसेच होणार आहेत. पूर्णपणे अहवाल तयार करा. माझा ह्या प्रकरणाला विरोध नाही. किंवा स्थायी समितीच्या सभापतींना ही माझा विरोध नाही पण मा. महापौरांचा जो मा. महासभेचा अधिकार आहे. पिठासीन अधिकारी स्थायी समितीच्या या एका पत्रावर त्यांचा ते निर्णय देणार आहेत, असे होते. मा. महासभेचा रितसर गोषवाऱ्यासह आपण पत्रव्यवहार आणा सगळा पत्रव्यवहार आमच्या समोर ठेवा. आम्ही योग्य तो निर्णय तुम्हाला लगेच देउ. ह्या विषयाकरिता आपण एखादी विशेष सभा लावा. हे ॲथोन्टीक पत्र नाही.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांनी या विषयी जी विस्तृत माहिती दिली त्याच्यामध्ये त्यांनी महत्वाचा मुद्दा असा दिला की, अनेक अपघात त्याठिकाणी होत आहेत आणि बऱ्याच लोकांना प्राण गमवावे लागले आहे. सर्व बाबतीतल्या गोष्टी आपल्याला परिपूर्ण मिळतात. पण एखाद्याचा जीव गेला की परत मिळत नाही आणि ह्या अतिशय महत्वाच्या प्रश्नावर बऱ्याचशा बैठका झाल्या. मला प्रशासना बाबत बोलायचे आहे. सन्मा. महापौर मॅडम मला एक उत्तर हवे आहे की, अशा कोणत्या कोणत्या सदस्यांनी आपल्याला याबाबत विचारणा केलेली आहे? त्यानंतर मी बोलतो कृपया माहिती द्यावी.

**मा. महापौर :-**

संबंधित अधिकाऱ्याने, सन्मा. सदस्य मोहनजी पाटील ह्यांच्या प्रश्नाचा खुलासा करावा.

**दिपक खांबीत :-**

ह्याबाबत मा. महापौर, मा. चंद्रकांत वैती साहेब ह्यांनी पत्रव्यवहार केलेला आहे आणि मा. श्री. रोहीदास पाटील साहेब ह्यांनी सुद्धा याबाबत पत्रव्यवहार केलेला आहे आणि मिरा रोड पालीस स्टेशनकडून आपल्याला पत्र आलेले आहे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सभागृहातील मा. उपमहापौर साहेब ह्यांनी पत्रव्यवहार केलेला आहे, सन्मा. रोहीदास पाटीलजी हे सभागृहात आहे आणि त्यांनीसुद्धा पत्रव्यवहार केलेला आहे.

**परशुराम पाटील :-**

खांबीत साहेब, आमचे पत्र ज्यावेळी महानगरपालिकेत इनवर्ड करतो तर आपल्याकडे त्याची ओ. सी. येत नाही का?

**दिपक खांबीत :-**

ओ.सी. येते.

**परशुराम पाटील :-**

मग ती पत्र कुठे आहे?

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मी ह्या गोष्टीचा निषेध करतो की, आमचे विरोधी पक्षनेते आहेत आणि त्यांच्या पत्राचा उल्लेख कुठेच नाही? शेम, शेम. आम्ही विरोध करतो. हे असे आम्हाला चालणार नाही. किती दुदैव आहे, आमच्या विरोधी पक्षनेत्यांचे कारण ते विरोधी पक्ष नेते कॉंग्रेस पक्षामधले आहेत ना. कॉंग्रेसची परिस्थितीच ती आहे. पक्ष नेत्यांची ही हालत आहे तर आमचे काय?

**मोहन पाटील :-**

सन्मा. विराधी पक्ष नेते परशूराम पाटीलजी ह्यांचे ही याबाबत पत्रव्यवहार झालेला आहे, कारण बरेचसे ॲक्सीडेंट त्याठिकाणी होतात.

**मिलन म्हात्रे :-**

आर. टी. ओ. चा अहवाल त्यात मेन्शन केलेले नाही.

**मोहन पाटील :-**

त्या ठिकाणी असे बरेच अपघात होत आहेत आणि मोटर सायकलचे मोठ्या प्रमाणात ॲक्सीडेंट झालेले आहे आणि माझ्या माहितीप्रमाणे वीस का पंचवीस लोक दगावलेली आहेत. तर आपण ह्यांच्यावर अंतिम निर्णय असा सांगितला आहे की, जी वाहतुक नियंत्रण शाखा आहेत ह्यांची आपल्याला गाईडलाईन घ्यायची आहे. सन्मा. सभापती महोदय, ह्यांनी चांगला विषय स्थायी समितीमध्ये आणला होता. कारण, पोलीस यंत्रणेकडून सन्मा. उपमहापौर चंद्रकांत वैतीजी, विरोधी पक्षनेते परशुराम पाटीलजी, भाजप गटनेते रोहीदास

पाटीलजी ह्यांनी सुद्धा या विषयी लवकरात लवकर निर्णय लागला पाहिजे, जेणेकरून बाकी सर्व गोष्टी उपलब्ध होतील म्हणून सभागृहाला माझी विनंती आहे की, आपण या विषयावर चर्चा घडवून आणावी आणि शेवटी अंतिम निर्णय घेताना वाहतूक नियंत्रण सभेचा अभिप्राय आपल्याला घ्यायचा आहे आणि आपल्याला तो अभिप्राय घेता येईल आणि असे अनेकदा विषय आपण त्या पद्धतीने सदनापूढे स्थायी समितीने शिफारस केलेला विषय आपण आणलेले आहे. तर कृपया मा. महापौर महोदया माझी अशी विनंती आहे की, आपण या विषयावर चर्चा घडवून आणावी आणि त्या पद्धतीने ठराव करून घ्यावा.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छितो की, जसे सन्मा. सदस्य मिलनजी म्हात्रे ह्यांनी सांगीतले की, प्रशासनाने गोषवारा दिला नाही ही एक गोष्ट खरी आहे. पण हा जो विषय आलेला आहे या विषयाचे महत्व असे आहे की, कोणी विषय आणला त्याला महत्व नाही. पण ही वस्तुस्थिती आहे की, त्या रस्त्यावर पाच माणसे ही मृत्युमुखी झाली. ६८ माणसं जखमी झाली वाहनांना किती दगाफटका झाला ह्याची नोंदच नाही. रोज त्या ठिकाणी ॲक्सीडेंट होत असते आणि ह्या निमित्ताने महिन्यापूर्वी आयुक्त साहेबांच्या दालनामध्ये वाहतूक अधिकारी, पोलीस निरीक्षक, आम्ही, आयुक्त साहेब, सिटी इंजिनिअर, नगररचनाकार ह्यांची बैठक झाली व ह्या बैठकीत परिपुर्ण विचार करून स्थायी समितीला तो विषय गेलेला आहे. स्थायी समितीने त्याच्यावर एकमताने चर्चा करून तो सद्विवेकबुद्धीने तो ठराव दिलेला आहे की, मा. महासभेत परिपुर्तता करण्यासाठी, मा. महासभेत हा विषय ठेवावा. अन्यथा या शहरातील नागरिकांचे हित सांभाळण्याचे कर्तव्य हे मा. महापौरांबरोबरच मा. आयुक्तांबरोबरच आपल्या सभागृहाचे आहे. त्याच्यावर आणखीन वेगळी चर्चा करण्याची काही गरज नाही. सन्मा. सदस्य गजानन भोईर ठराव मांडतील. आपण तो ठराव एकमताने मंजुर करावा. नाहीतर, वेगळा वेळ काढण्याचे कारण काय?

**मोहन पाटील :-**

ठराव सभागृह नेते साहेब मांडतात.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर, मॅडम, सभागृहात परिपूर्ण चर्चा घडण्याचे दृष्टीने मी ठराव मांडण्याकरिता थांबलो होतो.

**प्रकाश दूबोले :-**

मा. महापौर मॅडम, याविषयाबाबत आम्हाला बोलायचे आहे.

**गजानन भोईर :-**

मा. महापौर मॅडम, मी ठराव मांडत आहे.

(प्रकरण क्र. ७० च्या ठरावाचे सभागृहात वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण किती जणांना ठराव मांडण्याची परवानगी दिलेली आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईर साहेब आपण खाली बसावे.

(सन्मा. सभागृह नेते हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ७० च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन करायला सुरुवात केली.)

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ठराव कुठला घ्यायचा? आपण आपली रूलिंग द्या सन्मा. सदस्यांना खाली बसवा. सन्मा. सभागृह नेते ठराव मांडत आहेत ना?

**मदन उदितनारायण सिंग :-**

सचिव साहेब, ह्रया ठरावाला माझे अनुमोदन आहे. ते नोंद करून घ्यावे.

(सन्मा. सभागृह नेते हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ७० चा ठराव सभागृहासमोर मांडला.)

**मिलन म्हात्रे :-**

कनकिया हे नाव काढून त्याला मिरारोड पोलीस स्टेशन हे नाव द्या, अशी माझी एक सुचना आहे. कनकिया हे नाव न देता मिरारोड पोलीस स्टेशन रेव्हेन्युच्या बॉंड्रीचे नाव द्यावे.

**मिलन पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रोहीदास पाटील :-**

या ठरावामध्ये एक मिसींग राहते की, मध्ये जे ग्रीलचे ठरलेले आहे. मध्ये एक ग्रील लावायची आहे. त्याला ही मंजूरी द्या.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, या ठिकाणी जो ठराव मांडण्यात आलेला आहे आणि स्थायी समितीने जो ठराव पाठवलेला आहे. यामध्ये मिरारोड पोलीस स्टेशन महानगरपालिकेने संयुक्त पाहणी केली आणि त्यानंतर तसा प्रस्ताव एच. पी. कडे मंजूरी करीता पाठविला आणि आज आपल्याकडे निर्णयासाठी मा. महासभेसमोर विषय आलेला आहे. तर ह्यामधे तुम्ही जे मुद्दे दिलेले आहेत व स्थायी समितीने जे मंजूर केलेले आहेत. शिवाजी

महाराज पूतळ्या मागील पहिले दोन प्रवेश. आता जे तूम्ही नियमानूसार पाहणी केलेली आहे व जे नियम आहेत, जो नकाशा बनवलेला आहे, त्यांनी काय नियम लावला? जर शिवाजी महाराज पुतळयामागील पहिले दोन प्रवेश आता जे तुम्ही नियमानूसार पाहणी केलेली आहे आणि जे नियम आहेत जो नकाशा बनवलेला आहे त्यांनी काय नियम लावला. तर शिवाजी महाराज पुतळ्या मागचे जर दोन्ही प्रवेश बंद केलेतर ते दोन प्रवेश कोणते? एक पुतळ्याला लागून आहे तो आणि दुसरा सभापती- आसिफ पटेलजी त्यांच्या घराच्या समोरचा. इमिजिएट मागे एक आहे. त्याच्या मागे आसिफ पटेलांचा बंगला आहे तिथे दुसरा आणि तिसरा जो आहे तो ऑक्ट्रायचा दुसरा नाका आहे, जो चेक पोस्ट आहे तिथे तिसरा होतो आणि त्यानंतर डायरेक्ट सिल्व्हर पार्क म्हणजे ते तिन्ही रस्ते एकतर बंद केले पाहिजेत. त्या ठिकाणी एक रस्ता चालू राहत आहे. दुसरी गोष्ट सिल्व्हर पार्क ते एस. के. स्टोन. एस. के. स्टोन झाला की लगेच सिल्व्हर पार्क आणि एस. के. स्टोनच्या मध्ये कनकिया पोलीस स्टेशन दाखवलेले आहे आणि एस. के. स्टोन झाल्यानंतर शिवार गार्डन आणि शिवार गार्डन ते गोल्डन नेस्ट सिग्नलपर्यंत मधे तुम्ही डिवायडरच ठेवलेला नाही. त्या मधल्या लोकांनी कुठे जायचे? तो सर्वात मोठा अंतर आहे. त्या रस्त्याच्या मध्ये भागापासून गोल्डन नेस्टच्या सिग्नल पर्यंत त्याठिकाणी आपण डिवायडर ठेवलेला नाही मग त्यांनी पाहणी काय केली आणि सर्व्हे काय केला? आणि शिवार गार्डन ते काशिमिरा येथे जो शिवाजी महाराजांचा पूतळा आहे. त्या तेथे चार ठिकाणी आपण डिवायडर दाखवता. मॅडम, एन्ट्री दाखवता. प्रवेश दाखवता चार ठिकाणी, म्हणजे अर्ध्या भागामध्ये चार ठिकाणी आणि राहिलेल्या भागामध्ये एकही नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

तिथेच जास्त ॲक्सीडेंट होतात.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, तोच प्रश्न माझाही होता.

**प्रेमनाथ पाटील :-**

दुबोले साहेब तिथेच जास्त ॲक्सीडेंट होतात.

**प्रकाश दुबोले :-**

मग तिथले प्रमाण कमी करा. इथे एक वाढवायला पाहिजे ना.

**प्रेमनाथ पाटील :-**

तिथे डायरेक्ट सर्कल पूर्ण झालेले आहे.

**गजानन भोईर :-**

मा. महापौर मॅडम, जर नॅशनल हायवेला पाहिले तर कमीत कमी पाच-पाच ते सहा-सहा किलामीटरवर सिग्नल आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, नॅशनल हायवेला पाहिले तर शंभर शंभर किलो मीटवरही सिग्नल आहेत. तसे काय नाही.

**गजानन भोईर :-**

कुठे कुठे, शंभर मीटरवर सिग्नल आहे? दाखवा, ना शंभर मीटरवर कुठे सिग्नल आहेत?

**नरेंद्र मेहता :-**

मिरा भाईंदर रोडवर गोल्डन नेस्टपासुन आपण जर स्टार्ट केले ते काशीमिरा पर्यंत, तर शिवार गार्डन आणि गोल्डन नेस्ट ह्या पट्टयात सर्वांत जास्त लोकसंख्या आहे. त्यांना कूठेही डायर्व्हशन नाही. म्हणजे एखाद्या गोल्डन नेस्टवाल्याला महापालिकेला जायला शिवार गार्डन पर्यंत जायला लागेल व तेथून परत यु टर्न घ्यावे लागेल. त्यामूळे परत ट्रॅफीक वाढेल आणि मॅडम, आपण जर लोकसंख्या वाईस बघितले तर एक लाखाच्या वर येथे लोकसंख्या आहे.

**प्रकाश दुबोले :-**

मॅडम, ह्या मध्ये माझी अशी एक सूचना आहे की, शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या मागच्या ज्या दोन इंट्र्या आहेत त्या पहिल्या तिन्ही बंद कराव्यात मिरारोड पोलीस स्टेशनकडे जाणारी इंट्री बंद करावी आणि त्या बदल्यात दिपक हॉस्पीटलच्या समोर इंट्री ठेवावी.

**नरेंद्र मेहता :-**

दिपक हॉस्पीटलच्या येथे गरजेचे आहे कारण तिथे मोठ्या प्रमाणात लोकसंख्या आहे. गोल्डन नेस्ट, क्वीन पार्क, नया नगरला जाणारे रस्ते आहेत. पोलीस स्टेशन आणि एस. के. स्टोनला गरजेचे आहे.

**प्रकाश दुबोले :-**

एस. के. स्टोन ठेवावे. एस. के. स्टोन पासून पोलीस स्टेशन , सिल्वर पार्क पासून पोलीस स्टेशनला येता येईल.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, नाहीतर आपल्याला परत ठराव करावा लागेल की, आपण परत एखादा डिवायडर काढा. ते गरजेचे आहे.

**गजानन भोईर :-**

मॅडम, प्रत्येक गाडीवर लिहिलेले असते की, दुर्घटनासे देर भली, असू द्या काय हरकत नाही. दुर्घटना होण्यापेंक्षा ते खूप चांगले आहे.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय की, मी आपल्याला जो पत्रव्यवहार केलेला आहे आणि कमिशनर साहेबांनी आम्हाला जे उत्तर दिलेले आहे की, त्या ठिकाणी विचार करून रस्ता केला जाईल मग आता परत परत त्याच्यावर चर्चा कशाला?

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, दिपक हॉस्पीटलकडे सिग्नलचे समाविष्ट करणार आहात की, नाही? मॅडम, आपण तसे रूलिंग द्या. नाही करणार.

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छिते की, जांगीड ते सृष्टीपर्यंत आपण डिवायडर टाकणार आहोत सिल्व्हर पार्क ते जांगीड पर्यंत डिवायडरचे काम झालेले आहे. मॅडम, त्याची उंची जवळजवळ साडे तीन फुट आहे आणि त्याच्यामध्ये आपण शोभीवंत झाडेसुद्धा लावणार आहोत ही चांगली गोष्ट आहे. पण ह्या डिवायडरची उंची आणि आपण जी झाडे लावणार आहोत त्यामूळे त्यांची किती होईल त्याचा आपण अंदाज सांगू का?

**अशोक पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय की, मघास पासून ह्या ज्या विषयावर चर्चा होत आहे काशी मिरा रस्त्यामधील जे दुभाजक आहेत. अनावश्यक जो प्रवेश बंद करण्याचा विषय.........

**सुरेखा गायकवाड :-**

आयुक्त साहेब, या विषयावर तुमच्या बरोबर बोलणे सुद्धा झाले. तरी आपण त्यानंतर त्याच्यावर काहीच कार्यवाही केलेली नाही. दहा ते पंधरा लाखाचे दुकान घेउन दुकानदार बसलेले आहेत आणि आपल्या ह्या उंचीमूळे त्यांच्या धंद्याने मार खाल्लेला आहे. धंदे व्यवस्थीत चालत नाही. साहेब, डिवायडर रस्त्याच्या मध्ये आहे त्याची उंची किती असायला पाहिजे ह्याला काही नियम आहेत की, नाही.

**मा. आयूक्त :-**

आपण हे जे डिवायडर तयार करतो ते कशासाठी तयार करतो? तर संरक्षणासाठी तयार करतो.

**सुरेखा गायकवाड :-**

संरक्षणासाठी नक्कीच.

**मा. आयूक्त :-**

त्या डिवायडरचा आणि त्या दुकानदारांचा संबंध कुठे येतो?

**सुरेखा गायकवाड :-**

संबंध येतो ना.

**मा. आयूक्त :-**

दुकानं जी आहेत ती रस्त्याच्या कडेला आहेत.

**सुरेखा गायकवाड :-**

नाही. कारण उंची जास्त असल्यामुळे इकडून तिकडे लोकांना जाता येता येत नाही. मध्ये फार गॅप सोडलेला आहे.

**मा. आयूक्त :-**

डिवायडरवरून जाण्या-येण्याकरीता डिवायडर हा नसतोच

**सुरेखा गायकवाड :-**

साहेब डिवायडरची उंची भरपूर आहे. त्यामूळे इकडच्या दुकानदारांना तिकडचे काहीच दिसत नाही.

**मा. आयूक्त :-**

दिसण्याचा काही प्रश्न येत नाही. एखादी दहा किंवा बारा फूटाची त्याची उंची नसेल.

**सुरेखा गायकवाड :-**

साडे तीन फूटाची हाईट आहे आणि त्याच्यामध्ये आपण झाडं लावणार आहात, त्याची उंची किती होणार आहे ते आपण आम्हाला सांगा.

**मा. आयूक्त :-**

छोट्या प्रकारची झाडे, जी वाढणारी झाडे नाहीत अशा प्रकारची झाडें सुशोभित म्हणून लावणार आहोत.

**सुरेखा गायकवाड :-**

साहेब, ह्याच्यासाठी आमच्या दूकानदारांचा मोर्चा आपल्याकडे येईल आपण त्याला सामोरे जा.

**मा. आयूक्त :-**

मोर्चा येउ द्या.

**अशोक पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय की, सभागृहामध्ये बऱ्याच वेळेपासून ह्या विषयावर चर्चा होत आहे. छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील जे अनावश्यक दुभाजक आहेत ते बंद करण्याचा विषय हा जो प्रस्ताव स्थायी समितीमधून मा. महासभेसमोर चर्चेला आलेला आहे. ह्याच्यावर ठराव मांडण्यामध्ये ही स्पर्धा झाली आणि दोन ठराव ही झाले. परंतू, हा प्रस्ताव स्थायी समितीमधून या मा. महासभेसमोर येण्याचे प्रयोजन काय? मूळातच या प्रश्नाच्या गाभ्यापाशी कोणी गेलेलेच नाही. सुमारे ३५ करोड रूपये खर्च करून जेव्हा हा काशीमिरा रस्ता बनवला. त्या रस्त्यांमध्ये, त्या रस्त्यांच्या निविदांमध्ये जे सर्विस रोड होते ते सर्विस रोड कूठे आहेत? जर ते सर्विस रोड बनले गेले असते तर हे दुभाजक बंद करण्याचे किंवा सुरू करण्याचा प्रश्नच आला नसता. ते सर्विस रोड न केल्यामुळे आज ही परिस्थिती उद्‌भवलेली आहे. ३५ करोड रूपये खर्च करून जो मृत्यूचा सापळा हा रोड असे सर्व सभागृहाचे मत झालेले आहे. म्हणून आपण हा दुभाजकाचा प्रश्न येथे उपस्थित केलेला आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य अशोक पाटील साहेबांनी जे शब्द पुकारले मृत्यूचा सापळा. सन्मा महापौर मॅडम या शहरामध्ये काशी मिरा रोड हे या शहराची शान झालेली आहे आणि त्याच्याने सभागृहाचे, सन्मा. सदस्यांचे सगळ्यांचे संपूर्ण परिसरामध्ये जर आपण बघितले तर त्या रस्त्याबाबत लोक खरोखरच कौस्तूकास्पद बोलत आहेत.

**अशोक पाटील :-**

सभागृह नेते आपल्या भावनांशी मी सहमत आहे. परंतु, जो प्रश्न ज्या पद्धतीने उपस्थित झाला. तिथे पाच लोक बळी गेले. अनेक अपधात झाले. अनेक जणांचे ॲक्सीडेंट झाले. त्यामूळे मृत्यूचा सापळा असे वाक्य काढले.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सी. एम. साहेबांनी जे पहिल्याचे आयूक्त होते त्यांचे या रस्त्यासाठी अभिनंदन केलेले आहे.

**अशोक पाटील :-**

सन्मा. सदस्या मिलन पाटील साहेब आम्ही देखील अभिनंदन करतो.

**मिलन पाटील :-**

हा रस्ता मृत्यूचा सापळा होउ शकत नाही. आपण हा शब्द परत घ्यावा, मा. महापौर मॅडम मी आपल्याला असे निवेदन करतो.

**अशोक पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटीलजी तूम्हाला जर राग आला असेल तर मी माझे शब्द मागे घेतो.

**मिलन पाटील :-**

मृत्यूचा सापळा असे बोलू नका मूख्यमंत्र्यांनी त्या रस्त्यासाठी अभिनंदन केले आहे.

**अशोक पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेब, मुद्दा मृत्यूच्या सापळ्याचा नाही. प्रश्न असा आहे की, जे ३६ करोड रूपये या सभागृहाचे, या महापालिकेचे खर्च झाले. त्या ३६ करोडच्या खर्चामध्ये सर्विस रोड कुठे बनविलेले आहे? त्या सर्विसमध्ये अतिक्रमण झालेले आहे, सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेब, आपण त्याचे गांभीर्य का लक्षात घेत नाही. निविदेमध्ये जे सर्विस रोड दाखवले गेलेले होते त्या सर्विस रोडचे पैसे आपण ठेक्या वाल्याला दिलेले आहे आणि तिथे ते सर्विस रोड न बनवता ते न बनवल्यामुळे आज अपघाताचे प्रमाण प्रचंड झालेले आहे त्या सर्विस रोडमध्ये अतिक्रमण झालेले आहे आणि आजही चालू आहेत. ह्याच्यावर आपण काय कार्यवाही करणार आहात? ते सर्विस रोड का बनले गेले नाही ह्याचा प्रशासनाने खूलासा करावा आणि त्या सर्विस रोडच्या मार्गामध्ये आज ही अतिक्रमण चालू आहे. आजही तिथे अनधिकृत बांधकाम सूरू आहेत. ती कोणाच्या आर्शीवादाने, कोणाच्या परमिशनने ह्याचा खूलासा प्रशासनामार्फत व्हावा.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, या ठिकाणी दोन ठराव आलेले आहेत. मी सन्मा. भाजप गटनेते रोहीदास पाटीलजी ह्यांना विनंती करतो की, कृपया आपण आपला ठराव मागे घ्यावा.

**मिलन म्हात्रे :-**

तूम्ही तूमचा ठराव मागे घ्या ना.

**मोहन पाटील :-**

दोन ठराव या ठिकाणी आलेले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आपण आपला ठराव मागे घ्या. प्रत्येक वेळी आम्हीच ठराव मागे घ्यायचे का? तुमचे ठराव तुम्ही मागे घ्या ना. तुम्ही तूमची ती तयारी ठेवा ना. प्रत्येक वेळेला विरोधी पक्षाला ठराव मागे घ्यायला सांगता.

**मोहन पाटील :-**

आपण मा. महापौरांना सांगा आपण दोघे नंतर बोलू.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही नंतर बोलणारे नाही आणि ॲन्टीचेंबरमध्ये तर बिल्कुल बोलणारे नाही. टिपणी दिलेली नाही. तूमचा ठराव मागे घ्या ना. मन मोठे ठेवा.

**मोहन पाटील :-**

सभा कामकाजामध्ये मन मोठं ठेवून चालत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

गोषवारा दिलेला नाही.

**मोहन पाटील :-**

सभा कामकाजाचे आपण सभागृह नेते ठराव मांडतात आणि अनूमोदक विरोधी पक्षनेते देतात अशी पद्धत चालू केलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ही पद्धत तूमची आहे आणि सभागृह सभा कामकाजाच्या नियमाने चालते.

**मोहन पाटील :-**

सभागृह नेते साहेबांनी ठराव मांडलेला आणि त्यांचा ठराव जर त्यांच्या पद्धतीने आहे असे जर त्यांना वाटते तर त्यांनी ठराव मागे घ्यायला हरकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

कशाला? तुम्ही घ्या ना. तूम्ही ठराव मागे घ्यायचा.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईरजी ह्यांना मी विनंती करतो की, कृपया आपण आपला ठराव मागे घ्या. सभाकामकाजामध्ये नविन पायंडा पाडू नये. त्यांचप्रमाणे सन्मा. सदस्य अशोक पाटील ह्यांनी या ठिकाणी त्या ठरावाच्या अनूषंगाने काही सुचना मांडल्या त्या सुचना ठरावात अंतर्भूत होणार नाही. तिथला जो साईडचा रस्ता आहे, आठ फूट जो रस्ता आपण सोडलेला आहे, सर्विस रोड. तो ज्या ज्या ठिकाणी अव्हेलेबल असेल त्या त्या ठिकाणी परिस्थितीनूसार आपल्याला जागा मिळत असेल ते आपण करून घ्यावे. कारण रेल्वेच्या हायवेचे काम अशापद्धतीने चालतात. जेव्हा जेवढे अव्हेलेबल होईल तेवढे करून घ्या. बाकी नंतर करू जर काय अडचण असेल, काही कोर्टाचे मॅटर असेल ते तूम्ही नंतर करून घ्या ज्या ज्या ठिकाणी परिस्थिती व्यवस्थित असेल आणि जागा मिळत असेल त्या त्या ठिकाणी करण्याचा आपण प्रयत्न करावा अशी मी सूचना या ठिकाणी आपल्याला देत आहे. धन्यवाद.

**अशोक पाटील :-**

आयूक्त साहेब, परंतू सर्विस रोड का बनवण्यात आले नाही? ह्याचा प्रशासनाकडून खूलासा व्हावा की, आपण जर त्या ठेकेदाराला त्या सर्विस रोड सहित ३६ करोड रूपये भुगतान केलेले आहे. मग ते सर्विस रोड का बनवण्यात आले नाही. त्याचा प्रशासनाने जरासा खूलासा करावा आणि त्या सर्विस रोड मध्ये आजही अनधिकृत बांधकाम चालू आहे. तूम्ही आधी तिथे सर्व्हे करा.

**मिलन म्हात्रे :-**

त्याची रूंदी किती होणार आहे.........

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण पहिले ठरावाबाबत रूलिंग द्या.

**मिलन म्हात्रे :-**

पहिले ह्याचे रुलिंग झाले पाहिजे की, गोषवारा का दिला गेला नाही? त्याचे रुलिंग अजून झालेले नाही. ह्याच्यावर कुठल्याही ॲथोन्टीकल अधिकाऱ्याच्या सह्या नाही. ह्याचे पहिले रुलिंग आणि नंतर ठरावाच्या मारामाऱ्या करा.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्याने पहिल्या मारामाऱ्या केलेल्या आहेत. मा. महापौर मॅडम, ठराव झालेला आहे आणि आपण ठरावावर रुलिंग द्या.

**मिलन म्हात्रे :-**

रुपया खाली बसावे. तुम्ही कृपया बोलता, मी रुपया बोलतो, खाली बसा.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा महापौर मॅडम, एका रस्त्याने संपूर्ण शहराचे नाव महाराष्ट्रभर गाजविणारा चांगला निर्णय तत्कालीन नगरपालिका आणि महानगरपालिका ह्यांनी घेउन अतिशय चांगला रस्ता बनवला. पुणे, बैंगलोरवरुन येणारे लोक असे बोलतात की, हा मुबईतला पुणा-एक्स्प्रेस हायवे आहे. त्याच्यामुळे ह्याचे सगळे या सभागृहाला आणि प्रशासनाला आहे. ह्या रस्त्यामध्ये काही अपघात होतात म्हणून त्याची नोंद घेणे हे गरजेचे आहे. अर्थात हे झाल्यानंतर आपल्या लक्षात यायला लागले की, अपघाताचे प्रमाण हे वाढत आहे

आणि म्हणून याठिकाणी आपण ते अपघात कसे थांबवता येतील ह्याच्यासंबंधी नोंद घेतली. सर्व्हिस रोडच्या संदर्भामध्ये जो काही विषय निघाला ज्या-ज्या ठिकाणी आपल्याला आजही सर्व्हिस रोड करण्यासारखी परिस्थिती आहे. त्याठिकाणी आपण अशी परिस्थितीचा प्रशासनाने अभ्यास करावा आणि तसे सर्व्हिस रोड उपलब्ध ठेवावे. कारण बऱ्याचशा डेव्हलपर्सनी सर्व्हिस रस्त्याच्या जागा सोडून बांधकाम केलेले आहे. त्याच्यामुळे त्याठिकाणी सुद्धा ते आवश्यक आहे. अशामुळे जी मागणी आहे की, जे जवळ जवळ विभाजक पाहिजे ती मागणी जास्त कालांतराने टिकणार नाही. कारण त्या सर्व्हिस रोडचा वापर होईल याठिकाणी एकच सांगतो की, माझे वैयक्तिक आणि इतरांचे सुद्धा या ठिकाणी जवळ जवळ तीन पेट्रोल पंप आता दोन पेट्रोल पंप जागेवर आहेत. एक तिसरा पेट्रोल पंप रिलायन्सचा एल.पी.जी.चा लिखीव्हाईट पेट्रोलियम गॅस म्हणून येतो आणि चौथा पेट्रोल पंप एच.पी.चा आहे. असे चार पेट्रोल पंपमध्ये दोन पेट्रोल पंपला पुर्वीच पी.डब्ल्यू.डी.ने परवानग्या दिलेल्या आहेत रस्त्यावरुन. त्याच्यामुळे आपण आता जे काही सुचवले त्याच्यामध्ये ते अंतर्भुत केलेले नाही. पी.डब्ल्यू.डी.ने परवानग्या दिल्या तेव्हा रस्ता आपला नव्हता. बांधकाम खात्याचा होता. तो रस्तासुद्धा बांधकाम खात्याने आपल्याकडे हॅन्ड ओव्हर केलेला अहे. सर्वांच्या दृष्टीकोनातून, वाहनांच्या, सर्व नगरपालिकेची वाहने जातात, लोकांची वाहने जातात आणि ही जर विभाजक आपण बंद केली तर लांबचा रस्ता पडेल. म्हणून मी या ठरावाला दुरुस्तीची सुचना मांडत आहे की, ज्या ठिकाणी पेट्रोल पंप प्रस्तावित केलेले आहे, चालू आहे त्या ठिकाणी अशी विभाजक बंद करण्यात येउ नये अशी माझी सुचना आहे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, काशिमिरा रोड खरोखरंच खूप सुंदर आपण बनवलेला आहे. आपण तर त्याची स्तुती करतोच पण बाहेरुन येणारी लोकसुद्धा त्याची स्तुती करत आहेत. पुणे एक्सप्रेस हायवे असे आपण माजी नगराध्यक्षाने नाव दिले. ते काही खोटे नाव दिलेले नाही. तर खरोखरंच तो एक्सप्रेस हायवे आहे आणि एक्सप्रेस हायवेला पण अकस्मात अपघात भरपूर होतात. आपल्याकडे पण भरपूर झाले पण ते अकस्मात अपघात कसे कमी करायचे तो प्रश्न महत्वाचा आहे आणि आपण त्याच्यावर हे पाच रस्ते सोडून बाकी रस्ते बंद करण्याचा जो तोडगा आण काढलेला आहे त्या ठरावाला माझा विरोध नाही. परंतु, सन्मा. सदस्य अशोक पाटील ह्यांनी जो महत्वाचा मुद्दा उपस्थित केला की, सर्व्हिस रोड. सर्व्हिस रोड म्हणजे आपले महत्वाचे रोड होते आणि तिथे तुमच्या आणि आमच्या नजरेसमोर आपले अधिकारीपण त्याच रस्त्याने येतात, आपण सुंदर जो रस्ता बनवलेला आहे, ए.टी.पी. डिपार्टमेन्टचे सर्व अधिकारी, बांधकाम विभागाचे सर्व अधिकारी आपण त्याच रस्त्यावरुन येतो. त्या सर्व्हिस रोडवर चाललेले अतिक्रमण व झालेले अतिक्रमण ते काढण्याची जबाबदारी कोणाची? आणि जोपर्यंत आपण ते अतिक्रमण काढले जाणार नाही आणि आपण जी स्तुती करतो की, एवढा छान रस्ता आपण बनवला आहे. आपण हायवे बनवले, आपण हे केले आणि आपण ते केले. ही स्तुती करणे योग्य नाही. उल्हासनगरला जाउन बघा परिस्थिती काय आहे? आपण अनधिकृत बांधकाम तर तोडू शकत नाही. आपला रोडसुद्धा आपण मोकळा करु शकत नाही. मग आपल्या प्रशासनाची लायकीच काय राहिली आहे आणि महत्व काय राहिले? सॉरी, मी लायकी बोलायला नाही पाहिजे होते. महत्व काय राहिले? गायकवाड साहेब, आपण अनधिकृत बांधकाम तोडू शकत नाही. स्टे येते, हे येते. आपण ते सर्व मान्य करतो. परंतु, आपली स्वतःची जागा आहे. सर्व्हिस रोड आहे. तिकडचे अतिक्रमण काढण्यासाठी आपण सक्षम नाही. मग त्याच्यामध्ये आपले महत्व काय राहिले? आपण स्तुती करतो रोड छान बनवले. तिथे किती सर्कल बनवले, हे बनवले ते बनवले. आपण आपली स्तुती स्वतःच करतो. पण स्तुती करताना आपण आठवण करायला पाहिजे की, ते सर्व्हिस रोड गेले कुठे? कारण हा जो बजेट गेला रोड बनवण्यासाठी ३८ करोडचे त्याच्यामध्ये सर्व्हिस रोड नमुद होते, मग ते सर्व्हिस रोड का बनवले गेले नाही? त्याच्यामध्ये ते इनक्लूड होते. मग, का बनवले गेले नाही ते सर्व्हिस रोड.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य अशोक बळवंत पाटील व सन्मा. सदस्या रिटा शाह ह्यांनी विचारलेल्या प्रश्नाचा संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सदर प्रश्नाचे उत्तर सिटी इंजिनिअर ह्यांनी द्यावे. आपण सिटी इंजिनिअरला उत्तर द्यायला सांगा.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी आता जे काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्या संदर्भामध्ये मी आपल्याला असे सांगू इच्छितो की, काशिमिरा रस्त्याच्या बाबतीमध्ये आपण सभागृहामध्ये चांगल्याप्रकारे वक्तव्य केलेले आहे आणि महापालिकेने हा एक चांगल्या प्रकारचा रस्ता शहरासाठी खूला केलेला आहे, तयार केलेला आहे. हा रस्ता तयार करताना सर्व्हिस रोडच्या बाबतीमध्ये जे काही मुद्दे आता उपस्थित झालेले आहे त्या संदर्भामध्ये मी संबंधित खातेप्रमुखांकडून ती फाईल वगैरे मागवून घेतो आणि त्याप्रमाणे त्या ठिकाणी सर्व्हिस रोड कसे तयार होतील त्याबाबतचा प्रस्ताव आपल्या माहितीसाठी सादर करेन.

**रिटा शाह :-**

साहेब, आपण नविन आहे. ते ठिक आहे. पण माझ्याकडे आपल्याच कार्यालयाकडून आलेले उत्तर आहे. त्याच्यामध्ये क्लिअर कट लिहिलेले आहे. सर्व्हिस रोड निविदामध्ये आहे. सदर सर्व्हिस रोडचे काम सुरु आहे, असे लिहिले आहे. तर काम कुठे सुरु आहे? हे उत्तर आपल्या कार्यालयाकडूनच आलेले आहे.

**दिपक खांबित :-**

जिथे जागा मिळाली तिथे आपण माती भराव करुन लेव्हल केलेले आहे.

**रिटा शाह :-**

जागा मिळाली म्हणजे काय? तुमच्या चेअरवर आणि तुमच्या ऑफीस कार्यालयामध्ये जर कोण येउन बसणार तर मिळाले तरच मी माझ्या चेअरवर बसणार असे काही आहे का?

**दिपक खांबित :-**

जिथे जागा उपलब्ध झाली तिथे माती भराव केलेला आहे.

**रिटा शाह :-**

आता, खांबित साहेब, ज्या खुर्चीवर आणि केबिनमध्ये बसतात. तिथे कोणीतरी येउन बसले तर हे बाहेर उभे राहणार का? आणि ह्यांना विचारणार की साहेब, बाहेर कशाला उभे आहात? तर माझ्या खुर्चीवर कोण बसले आहेत ते उठणार तेव्हा मी बसणार असे काही आहे का? सही पण त्यांचीच आहे आणि ते उत्तरही त्यांचेच आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, सर्व्हिस रोडका लेटर मेरे पास भी है। सर्व्हिस रोड का काम चालू है।

**रिटा शाह :-**

इन्क्ल्यूड होते आणि साहेब, पेमेन्ट किती झाले? ह्याच्यामध्ये लिहिले आहे की, सर्व्हिस रोड इन्क्ल्यूड आहे. सर्व्हिस रोडबद्दल, काशिमिरा रोडबद्दल आपण किती पेमेन्ट केले? ३८ करोड रुपयाचे आपण बजेट दाखवतो आणि त्याच्यामध्ये त्यांना सर्व्हिस रोड उपलब्ध झाले तेवढेच त्यांनी बनवले आणि बाकी पेंन्डींग आहे. मग पेंन्डींग कसे काय राहिले आणि ते का उपलब्ध करुन घेत नाही? आपल्या जागेवर जर कोण अतिक्रमण करत असेल तर ते आपण सोडू शकत नाही. मग बाकीचे अनधिकृत बांधकाम तोडणार कोण?

**मा. आयुक्त :-**

सर्व्हिस रोडच्या बाबतीमध्ये मी आपल्याला जसे सांगितले त्याप्रमाणे सर्व्हिस रोडमध्ये कुठल्या प्रकारची, कशी कशी बांधकामे येत आहेत? त्याचा संपूर्ण अहवाल मी पाहणी करुन जो काही अहवाल असेल तो अहवाल मी आपल्याला सादर करेन. परंतु, ते सर्व्हिस रोड आपल्याला कशापद्धतीने कार्यरत करता येतील. मी त्या बाबतीमध्ये विचार करेन.

**रिटा शाह :-**

साहेब, महत्वाची गोष्ट अशी की, आपली रुलिंग आम्हाला अशी पाहिजे, मा. महापौर मॅडम ची सर्व्हिस रोडमध्ये जे काही बांधकाम झालेले आहेत ते सर्व इललिगल आहेत आणि ते तोडण्याची हमी आपण आम्हाला द्या. की ते बांधकाम आपण किती दिवसात तोडणार? आणि सर्व्हिस रोड उपलब्ध करून देणार ती हमी देखील आपण आम्हाला द्या. नुसते आपण रुलिंग देणार, आपण बोलले गेले, चालले, खाल्लेपिल्ले आणि आपण गेलो आपल्या घरी असे नाही.

**गजानन भोईर :-**

मॅडम, मागे स्थायी समितीचे सभापती आणि आम्ही संपूर्ण सदस्य पाहणीसाठी गेलो होतो. तिथे ए.टी.पी. चे अधिकारी होते, उपायुक्त रणखांब साहेब होते आणि त्यावेळेस असे सांगितले की, त्वरीत ही कामे बंद करुन सर्व्हिस रोड चालू करावा. ह्या गोष्टीला एक वर्ष झाले. तरीही कोणीही अधिकाऱ्याने त्याच्याकडे लक्ष दिलेले नाही. त्याच्यानंतर हे बांधकाम जवळ जवळ पुर्ण झालेले आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, विषयाला अनुसरून परत एकदा चर्चा........

**रिटा शाह :-**

मा. सभागृह नेते विषयाला अनुसरुन बोलते. आपल्या गावातील महत्वाची बाब आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्या आपने जो चर्चा की वह गलत है। ऐसी मेरी धारणा या मेर केहना नही है। मेरा कहना यही है मा. महापौर मॅडम, सर्व सन्मा. सदस्यांच्या सूचना विचारात घेता, सगळयांची इच्छा आणि भावना अशी आहे की, या शहरामध्ये केलेल्या रस्त्यांना अनुसरुन सर्व्हिस रोड झाला पाहिजे. आगामी मा. महासभेपुढे आपण सर्व्हिस रोडबाबत परिपुर्ण प्रस्ताव आणावा. आणि कारण सर्व सन्मा. सदस्यांच्या सुचना विचारात घेता, हा प्रस्ताव आपण आगामी काळामध्ये तयार करुन मा. महासभेसमोर घ्यावा अशी मी आपणांस विनंती करतो.

**रिटा शाह :-**

प्रस्ताव आणणार असे आम्हाला साहेबांनी सांगितले, हमी दिलेली आहे. परंतु, जे अनधिकृत बांधकाम झालेले आहे, त्याबद्दल काय?

**प्रेमनाथ पाटील :-**

ते तोडणार का?

**रोहिदास पाटील :-**

त्याची एक वर्षापुर्वीची यादी तुमच्याकडे आहे.

**रिटा शाह :-**

याबाबत आपण ताबडतोब रुलिंग द्या की, ते बांधकाम आठ दिवसात तोडून सर्व्हिस रोड उपलब्ध करुन द्यावे.

**रोहिदास पाटील :-**

ज्याची अनधिकृत यादी तुमच्याकडे वर्षभर तयार आहे, तर तुम्ही असे रुलिंग का देत नाही, की उद्यापासून सगळे ते अनधिकृत बांधकाम काढायला सुरुवात करतो. ते सभापती बोलणार नाही कारण ते स्वतः पाहणी करायला गेले होते. त्यांच्याकडे त्याची यादी आहे की, हे बॉन्ड्रीमध्ये आहे. आजचे सभागृह तुम्हाला विनंती करते, आग्रह धरते आणि आता हायकोर्टाचे निर्देश आल्यानंतर आपण काम करणार का? आपण जुने न बघता आता जर तुम्हाला वाटते की, दोन वर्षापूर्वी, महिन्यापूर्वी, सहा महिन्यापूर्वी जे अनधिकृत बांधकाम चालू आहे, तर महापौर म्हणून मी रुलिंग देते की, उद्यापासून ते बांधकाम तोडायला सुरुवात होईल असे आपण रुलिंग द्या ना.

**मोहन पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम, सभागृहामध्ये बऱ्याच सदस्यांनी आपल्याला असे सांगितले की, असे रुलिंग द्या. आम्हाला तुम्ही असे रुलिंग द्या. मला कळत नाही की, महापौरांना आपण कसे सांगणार की, आपण असे रुलिंग द्या.

**रोहिदास पाटील :-**

मागतो ना आम्ही आग्रहाने.

**मोहन पाटील :-**

आग्रह आहे आणि आग्रहाने बरेच काही सांगता येते. आता विषयाला अनुसरुन विषय आहे.

**रिटा शाह :-**

स्थायी समितीचे सभापती, मुलं जी असतात मॅडम, ते आईकडेच रडत असतात की, आम्हाला हे द्या, ते द्या, असे द्या, तसे द्या. ह्यांना माहित नाही, कारण ते नेहमी बाप होऊन राहिले, ते मुल झाले नाही. दहा वर्षापासून मी त्यांना बघितले, सारखे ते सभापती म्हणजे बाप म्हणून राहिले आहे. म्हणून त्यांना माहित नाही.

**मोहन पाटील :-**

आता काय करु? मॅडम, आता काय करु? येथे राजकिय बाप माझा गिर्ल्बट मेन्डोसा शेठ आहेत ना, म्हणून मग मी त्याच्याकडे रडतो, हा विषय वेगळा आहे, मा. महापौर मॅडम, परंतु मला एकच या ठिकाणी बोलायचे आहे की, विषयाला अनुसरुन विषय निघालेला आहे. विषय डिवायंडर बद्दल होता. सर्व सन्मा. सदस्यांनी चर्चा केलेली आहे आणि या विषयावर ठराव ही झालेला आहे. आपण ज्या पद्धतीने सभागृहामध्ये सदस्यांच्या सुचना आलेल्या आहेत, आयुक्त महोदय आपण आपल्या दालनामध्ये गटनेत्यांना बोलावून त्याची सविस्तर माहिती द्यावी आणि या विषयावर सर्वांनी चर्चा केलेली आहे आणि हा विषय रद्द करण्याविषयी रुलिंग तसा त्या विषयावर ठराव होउ शकत नाही.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, आता असे झाले की, आम्ही आपल्याकडे डायरेक्टली रडतो. आपण असे द्या. आपण अशी रुलिंग द्या. आम्ही तुमच्याकडे मागणी करतो आणि ह्यांनी इनडायरेक्टली सांगितले की, असे करा, तसे करा, म्हणजे चांगल्या भाषेत ते तुमच्याकडे रडले नाही. आम्ही रडून मागतो की, तुम्ही अशी रुलिंग द्या. त्यांनी पण तेच सांगितले तुम्हाला की, तुम्ही पुढे हे करा, ते करा, असे करा आणि तसे करा. शेवटी निर्णय तुम्हाला घ्यायचा आहे आणि ह्या सभागृहाने निर्णय घ्यायचा आहे की आपल्याला सर्व्हिस रोड पाहिजे तर आपण रुलिंग द्या. आता मी असे सांगतो की, महापौरांना सर्व्हिस रोड खरोखर बनवायचे असेल तर अशी रुलिंग द्या की, अनधिकृत बांधकाम ताबडतोब तोडण्यात यावे आणि जर बनवायचे नसेल तर उलटा पुलटा काय ते फसवा फसवीची गोष्ट करता. गटनेता बोलवू ह्याला बोलवू, त्याला बोलवू, आपण करु, असा आपण निर्णय द्या.

**गजानन भोईर :-**

मा. महापौर मॅडम, मुख्यमंत्री म्हणतात की, रस्ता चांगला आहे, सर्व चांगले आहे.......

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह आपण बोलताना शब्दाचे भान ठेवून बोलत जा.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, सुंदर रस्त्याबद्दल सर्वांनी प्रशंसा केली आणि सगळ्यांनी शहराला शाबासकी दिली. त्याचप्रमाणे त्या रस्त्याला आतापर्यंत जो रस्ता झालेला आहे तो ४५ मीटरचा रस्ता आहे का? ह्याचे कोणी मोजमाप केले का? तो रस्ता ४५ मी. आहे तो आता आहे का? त्याची कोणी शहानिशा केली का? आणि सर्व्हिस रोड पुर्ण काढणार आहेत. जेव्हा हा प्रस्ताव पास झाला तर तो एकूण मीटरचा रस्ता होता?

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, मुझे ध्यान मे नही है की, मैने ऐसा क्या गलत बोल दिया। आप हमे बोलिए ना, ऐसा नही है आवेश मे आकर हर कोई बोलता है। लेकिन ऐसा मैने क्या गलत बोल दिया। मुझे तो लगता नही है की, मैने आपको कुछ गलत बोला।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या आपण आपल्या वाक्यामध्ये असे शब्द वापरले की, जर तुम्हाला फसवाफसवीच्या गोष्टी करायच्या असतील तर नेते, विरोधी पक्षनेते, गटनेते ह्यांना बोलून चर्चा करा. आपण चर्चा करत आहोत आणि त्या चर्चेतून आपल्याला काहीतरी मार्ग काढायचा आहे. आपण दोन्ही बाजू सांगु नका. आपल्याला काय सुचना मांडायची आहे ती सुचना आपण सभागृहासमोर मांडा.

**रिटा शाह :-**

सुचना मांडल्या ना. आमच्या सुचनांवर कुठे रुलिंग होते. आपण नेहमी आम्हाला असेच सांगाल.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या आपण सुचना मांडल्या आहेत आणि आपल्या सुचनांच्या नेहमीच आदर आहे. आपण बसून घ्या.

**रिटा शाह :-**

आदर ठेवा. आम्ही पण तुमचा आदर करतो ना. आम्ही फसवा फसवीचे धंदे करत नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह सभागृहात आपल्याला असे बोलणे शोभत नाही. फसवाफसवी ही भाषा सभागृहात बोलणे अयोग्य आहे.

**रिटा शाह :-**

बरोबर आहे. अयोग्य आहे ना. मॅडम, मग मी चांगल्या पद्धतीने बोलते, की आपण स्पष्ट रुलिंग द्या की पुढच्या सभेत घेउ. गटनेत्यांना बोलवू, चर्चा करु-विचारु.......

**मा. महापौर :-**

मला वाटते आपण तीन टर्ममध्ये नगरसेविका झालेल्या आहेत माझ्या पेक्षा जास्त आपल्याला माहिती असेल.

**रिटा शाह :-**

चांगले नॉलेज आहे.

**मा. महापौर :-**

मी पहिल्याच टर्ममध्ये नगरसेविका आणि महापौर झालेली आहे.

**रिटा शाह :-**

मॅडम, या सभागृहामध्ये शिवीगाळी सुद्धा झालेली आहे. मारामाऱ्यापण झालेल्या आहेत.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या आपण बोलताना विचार करुन बोला.

**रिटा शाह :-**

मॅडम, मी विचार करुनच बोलते मला माहित आहे कुठल्या पद्धतीने रुलिंग द्यायचे आणि कुठल्या पद्धतीने रुलिंग देण्यात आलेले आहे. ही माझी तिसरी टर्म आहे आणि हे माझे चौदावे वर्ष आहे. मला ही माहित आहे की, कुठला शब्द वापरायचा नाही आणि कुठला शब्द वापरायचा.

**सिंग मदन उदितनारायण :-**

मा. महापौर मॅडम की अनुमती से बोलना चाहता हूँ, अभी जो यहाँपर शहर के हित मे जो डिवायडर बंद करनेका प्रस्ताव आया है, वह शहर की जनता के लिए बहुत अच्छा प्रस्ताव है। जैसे के अभी सन्मा. सदस्य अशोक पाटीलजी ने कहा, मृत्युचा सापळा वह अगर यह बन जाएगा तो वह बंद हो जाएगा। लेकिन इसके साथ ही जो सर्व्हिस रोड का विषय आया, अभी बांधकाम के अधिकारीयोने कहा की, सर्व्हिस रोड बनाने का काम चालू है। मेरी ऐसी सूचना है की, सदन को, सभागृहको, इस शहर की जनता को गुमराह न किया जाए। और अगर उनके हिसाब से सर्व्हिस रोड बनानेका काम चालू है, तो वह काम जल्द से जल्द चालू किया जाए, और जो की अतिक्रमण का विषय है। आयुक्त महोदय जो अतिक्रमण हो गए है उसपे आप जो कार्यवाही करेंगे वह करेंगे। लेकिन आयुक्त महोदय और मा. महापौर मॅडम से, मै आज सदन को उनसे विश्वास लेना चाहता हूँ की, आज के बाद उस सर्व्हिस रोड के रस्ते मे एकभी अतिक्रमण नही होगा, यह मैं आप से रुलिंग चाहता हूँ।

**मा. महापौर :-**

सभागृहाच्या भावना लक्षात घेता छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर मध्यभागी रस्ता दुभाजकातील अनावश्यक प्रवेश बंद करणे याबद्दल विचार विनिमय करत असताना या रस्त्यावर सर्व्हिस रोड व्हावा ही सर्व सदस्यांची मागणी आहे व शहरामध्ये हा सुंदर रस्ता आणि ह्याच्या बाजूला सर्व्हिस रोड होणे आवश्यक आहे. यासंबंधी आयुक्त महोदयांनी चौकशी करुन आठ दिवसामध्ये आमहाला सविस्तर माहिती उपलब्ध करुन द्यावी. आणि सर्व्हिस रोड करण्याकामी सहकार्य करावे. तसेच, सभागृह नेते सन्मा. हॅरल बोर्जीस व विरोधी पक्षनेते सन्मा. परशुराम पाटीलजी ह्यांनी मांडलेला ठराव सर्वानुमते मंजुर व सन्मा. सदस्यांनी मांडलेल्या सूचना सह हा ठराव मंजुर.

**गजानन भोईर :-**

मा. महापौर मॅडम, ठराव पहिला आम्ही मांडला. ठराव एकच आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्याला बोलण्याची परवानगी देण्याच्या अगोदर आपण उठून गोंधळामध्ये ठराव मांडलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ठराव ह्यांनी वाचल्यानंतर त्यांनी वाचला ना. आपण वस्तुस्थिती का नाकारता?

**मा. महापौर :-**

दोन्ही ठराव समान आहेत. ठरावात काही तफावत नाही. आपण ठराव मागे घ्यावा.

**रोहिदास पाटील :-**

पण कशासाठी? सन्मा. सदस्य गजानन भोईर ह्यांनी मांडलेल्या ठरावाला सभागृह नेते सन्मा. हॅरल बोर्जीस ह्यांचे अनुमोदन घ्या. संपला विषय.

**मोहन पाटील :-**

सभागृहामध्ये आपण अशी पद्धत सुरु केलेली आहे आणि आपल्या मागच्या दोन सभा अशाच झाल्या आहेत. सभागृह नेते ठराव मांडतात आणि अनुमोदन विरोधी पक्ष नेते देतात. त्या पद्धतीप्रमाणे ठराव असावा. आपण आता पद्धत कशाला मोडायची?

**रोहिदास पाटील :-**

आपण अध्यक्ष म्हणून बोलता. आपण पहिले केलेले निवेदन विसरुन गेलात. आपण असे निवेदन केले होते की, पुढे घ्या म्हणून केले होते. हे तुम्ही विसरु नका. आपल्या बोलण्याचा रोष तो होता. जर सन्मा. सदस्य गजानन भोईर ह्यांनी ठराव मांडला नसता तर तुम्ही त्या जागेवर आलेच नसते हे तुम्ही नाकारु नका. आम्हांला काय, तुम्ही घ्या ठराव.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, ह्या ठरावाला स्थायी समितीमध्ये ह्याच लोकांनी अनुमोदन दिलेले आहे आणि सर्वानुमते ठराव मंजुर झालेला आहे. स्थायी समितीच्या ठरावामध्ये आणि ह्या ठरावामध्ये काही फारक नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सचिवजी पुढील विषयाला सुरुवात करावी.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, ऐसा कौनसा कायदे मे है की, ठराव रुलिंग पार्टी कर सकता है।

**सिंग मदन उदितनारायण :-**

ऐसा कायदा है क्या?

**शिवप्रकाश भुदेका :-**

सचिव साहब, ऐसा कायदा है क्या?

**सिंग मदन उदितनारायण :-**

असा कायदा असेल तर आपण आम्हांला दाखवा.

**मिलन म्हात्रे :-**

सचिवजी, मी पहिला प्रश्न विचारला की, ह्याच्यावर टिपणी का नाही? ह्याचे काही उत्तरच नाही.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, ठराव रुलिंग पार्टी कर सकता है, ऐसा कायदे मे है क्या?

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, सदर विषयावर प्रशासनाच्या वतीने टिपणी, गोषवारा काहीच नाही.

**मा. महापौर :-**

स्थायी समितीला गोषवारा दिलेला होता. स्थायी समितीकडूनच सदरचा विषय शिफारस झालेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पण आपल्या मा. महासभेचे काहीच नाही.

**मा. महापौर :-**

हा पहिला विषय नाही की, अशा प्रकारे आलेला आहे. अनेक वेळा असे विषय सभागृहात आलेले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

हे चुकीचे आहे. आपल्याला प्रशासन गोषवारा का देऊ शकत नाही? आयुक्त साहेब, आपण याबाबत खुलासा करावा. हे योग्य आहे का? ठराव असा ठेवून चालणार नाही, स्थायी समितीचा.

**मिलन पाटील :-**

योग्य आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचे उत्तर मागितले नाही. साहेब, उत्तर देतील.

**रोहिदास पाटील :-**

अशा पद्धतीने चालणार नाही. एकतर तुम्ही दिले नाही हे तुम्ही मान्य करा.

**मिलन म्हात्रे :-**

आपली चुक मान्य करा ना. हे काय तुम्ही हात पकडण्याचे चालू केले आहे का?

**रोहिदास पाटील :-**

हे पाटील बोलतील का, असे नाही. हे सभागृह चालते.

**मिलन म्हात्रे :-**

आणि जर असे करायचे असेल तर आम्हांलाही भरपूर करता येते. एकही मिटींग चालू देणार नाही हे लक्षात ठेवा.

**मोहन पाटील :-**

अशी धमकी देऊ नका. आपण करुन दाखवा.

**मिलन म्हात्रे :-**

धमकी नाही, करुन दाखवू.

**मोहन पाटील :-**

लोकशाहीमध्ये असे बरोबर नाही.

**मिलन म्हात्रे :-**

धमकी नाही, आम्ही करुन दाखवतो.

**मोहन पाटील :-**

काय करायचे आहे ते करा ना.

**मिलन म्हात्रे :-**

काय करायचे आहे ते आम्ही करतो.

**मोहन पाटील :-**

तुम्ही धमकी काय देता?

**मिलन म्हात्रे :-**

धमक्या नाही, आम्ही करुन दाखवतो आणि आम्ही केलेले देखील आहे आणि पुढे करु देखील.

(सभागृहात गोंधळ)

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, पाठीमागे सभागृहात न चालणारी भाषा केली आहे. परंतु, ती भाषा केल्यामुळे सभागृहात काय झाले ते त्यांना कदाचित ज्ञात नसेल. ते त्यांनी ज्ञात करुन घ्यावे.

**मिलन म्हात्रे :-**

काय झाले? आपण काय बोललात?

**शिवप्रकाश भुदेका :-**

सचिव साहब, ऐसा नियम मे है क्या, ठराव रुलिंग पार्टी रख सकता है? नियक का बुक आपके पास है ना?

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, ह्याबाबत प्रशासनाला खुला करु द्या ना. एवढा महत्त्वाचा जो विषय झाला, अतिक्रमणाचा विषय निघाला. सगळं काय आहे? प्रशासन काय म्हणते? टिपणी का देऊ शकले नाही? ह्याच्यामध्ये आयुक्त असमर्थ आहेत का? कोणा अधिकाऱ्याला वेळ नाही?

**मा. आयुक्त :-**

सदर विषयावर चर्चा झाली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

चर्चा कसली झाली? चुकीच्या विषयावर वाटेल तशी तुम्ही चर्चा कराल ते चालेल का? विषयाला सुरुवात होतानाच मी बोललो की, हा विषय चुकीचा आणला आहे. तुम्ही जे ठरवाल ते होत नाही. पद्धत असते, काहीतरी नियम आहेत. प्रशासनाने सांगावे की, त्यांनी का सही केली नाही? मुद्दा असा की, टिपणी का दिली नाही? आयुक्तांची सही का नाही?

**दिपक खांबित :-**

प्रशासनामार्फत स्थायी समितीला गोषवारा दिलेला होता.

**मिलन म्हात्रे :-**

आपण बोलायचे नाही. आपण कॅपेबल नाही. येथे सिटी इंजिनिअर आहेत. त्यांनी उत्तर दिले पाहिजे. ते डायसवर बसले आहेत ना? आपण कॅपेबल नाही, आपण बाजुला व्हा. आयुक्त किंवा सिटी इंजिनिअर साहेब उत्तर देतील. हे चालायचे नाही. जे अधिकारी आहेत त्यांनी उत्तर द्यावे, नियमानुसार. मॅडम, आपण नियम तोडू नका. तुम्ही नियम तोडायचा नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेजी आपण सभागृहाला समोरासमोर असे शब्द वापरु नये. आपण सभागृहाचे पावित्र्य राखा.

**मिलन म्हात्रे :-**

आयुक्त हजर आहेत, सिटी इंजिनिअर हजर आहेत. सिटी इंजिनिअरला आपण ह्याच्याकरिता पगार देतो, गाडी-घोडे, दालन, गाडी ह्याच्याकरिता देतो. सिटी इंजिनिअरने उत्तर द्यावे. उगीच भलतं-सलतं करु नये.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, बरोबर आहे. पण त्यांना बोलण्याची पद्धत चेंज करायला सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

आपण मला बोलण्याची पद्धत शिकवायची नाही. तुम्ही काय आम्हांला पद्धती शिकवता? अशी वेळ तुम्हीच आणता.

**मोहन पाटील :-**

शिकवता म्हणजे काय?

**मिलन म्हात्रे :-**

हे बोलले नसते तर विषय आला नसता. हे मध्ये का बोलले?

**मोहन पाटील :-**

ते बोलले होते. तुम्ही असे कसे बालता, ह्यांना बाजुला करा. त्यांना बाजूला ते हे सांगणार आहेत का?

**मिलन म्हात्रे :-**

सिटी इंजिनिअरने हजर राहावे. आपण सांगा नियम काय आहे? सिटी इंजिनिअरचे काम काय आहे? आयुक्तांचे काम काय? गोषवारा देणे हे आयुक्तांचे काम आहे.

**मोहन पाटील :-**

ह्याची तुम्हांला कल्पना आहे ना?

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला जी कल्पना आहे, तिच कल्पना तुम्हांला देतोय.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेजी, वैरागडे साहेब असले तरी खांबित साहेब त्याचे उत्तर देत आहेत. त्यांना खुलासा करायला पिठासिन अधिकारी म्हणून मी परवानगी दिलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

शहर अभियंता हजर आहे, त्यांनी उत्तर द्यावे, विषय संपला.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय. सदरचा विषय हा सर्वानुमते मंजुर झालेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या पद्धतीने प्रोसिडींग कळणार नाही.

**मिलन पाटील :-**

मॅडम, त्यांना वाटले तर त्यांनी शासनाकडे जाऊन ठराव कॅन्सल करुन आणावा. त्याला आमची काही हरकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तेवढे धंदे कारयचे का आम्ही?

**मिलन पाटील :-**

तुम्ही दादागिरीच्या गोष्टी करता ना? मग शासनाकडे जाऊन तुम्ही ठराव कॅन्सल करुन आणा.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या दादागिरीवर आम्ही दादागिरी करणार हे लक्षात ठेवा.

**मिलन पाटील :-**

हा ठराव आम्ही सर्वानुमते मंजुर केलेला आहे.

**मा. महापौर :-**

सचिवजी पुढील विषयाला सुरुवात करावी.

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम, प्रशासनाकडून उत्तर का येत नाही? प्रशासनाने उत्तर द्यावे. आयुक्त साहेब हे काय चालले आहे? आम्हांला प्रशासनाकडून उत्तर पाहिजे. येथे तोंड नाही बघायचे. तुम्ही ह्याच्यावर सही का करु शकले नाही? आपण गोषवारा का दिलेला नाही? शहर अभियंत्यांनी ह्याच्यावर उत्तर द्यावे. कमिशनर साहेब, आपण या विषयावर असहाय आहात का, हेल्पलेस आहात? का पॉवर्स तुमच्याकडे नाही? का आपण मजबुर आहात? तुमच्या तोंडातून बाहेर शब्द का निघत नाही? हसायचे नाही. येथे कोण जोकींग करत नाही.

**प्रकरण क्र. ७० :-**

छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर मध्यभागी रस्ता दुभाजकातील अनावश्यक प्रवेश बंद करणेबाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. ७४ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत छत्रपती शिवाजी महाराज मार्ग हा रस्ता महानगरपालिकेमार्फत तयार करण्यात आलेला असून सदर रस्त्यावर क्रॉस रस्त्यांना जास्त प्रमाणावर प्रवेश एंट्रया असल्याने वाहनांना मुख्य रस्त्यावरून वेगाने येणाऱ्या वाहनामुळे क्रॉस रस्त्यातून येणाऱ्या वाहनांना अपघात होऊन जिवित व मालमत्तेची हानी नाकारता येत नसल्याने मा. पोलिस निरीक्षक, मिरारोड, पोलिस स्टेशन यांनी करावयाच्या उपाययोजनेचे एक रेखाचित्र तयार करून कारवाई करीता या कार्यालयाकडे सादर केलेले आहे. सदर पत्रानुसार महानगरपालिकेने संयुक्त पाहणी करून परवानगी देण्याकरीता मा. पोलिस निरीक्षक, वाहतूक शाखा, ठाणे (ग्रामिण) यांच्याकडे प्रस्ताव पाठविलेला होता. सदर प्रस्तावावर चर्चा करण्याकरीता स्थानिक पोलिस अधिकारी, वाहतूक शाखेचे अधिकारी यांची बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीत ठरवल्यानुसार सदर रस्त्यावरील, खालील प्रवेश / एंट्रया सोडून इतर सर्व प्रवेश बंद करावयाचे आहेत.

१) शिवाजी महाराज पुतळया मागील पहिले दोन प्रवेश
२) सिल्व्हर पार्क जंक्शन (सिग्नलचे काम सुरू आहे)
३) एस.के. स्टोन पोलिस चौकी जंक्शन (सिग्नलचे काम सुरू आहे)
४) मिरारोड पोलिस स्टेशनकडे जाणारा जंक्शन
५) शिवार गार्डन जंक्शन (सिग्नलचे काम सुरू आहे)

वरील ठिकाणी रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या दुभाजकातील प्रवेश / एंट्री सोडून इतर सर्व ठिकाणचे प्रवेश मध्यभागी डीव्हायडर बांधून बंद करणे आवश्यक आहे असे मत मा. स्थायी समितीने व्यक्त करून एकमताने ठराव पारीत केलेला आहे. तरी मा. स्थायी समितीच्या ठरावानुसार सदर रस्त्यावरील ठरावात नमूद १ ते ५ ठिकाणचे प्रवेश एन्ट्रया सोडून इतर सर्व प्रवेश तात्काळ बंद करण्यास तसेच येणाऱ्या खर्चास ही सभा मंजुरी देत आहे. तसेच सदर रस्त्याच्या दोन्ही बाजूस डीव्हायडर मध्ये लोखंडी रेलिंग बसविण्यास येणाऱ्या खर्चास सुध्दा ही सभा मंजुरी देत आहे. सदर रेलिंग वर खाजगी प्रायोजकाकडून वृत्तपत्रात जाहीरातीद्वारे ऑफर्स मागवाव्यात. तसेच मध्यभागातील लॅडस्केपिंग व हीरवळ महानगरपालिकेने स्वतः देखभाल, निगा राखण्यात यावी.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम, त्यांना उत्तर देऊ द्या ना. हे काय चालले आहे? कसले उत्तर आले? सभागृहामध्ये प्रकरण क्र. ७० चुकीच्या पद्धतीने आणुन, चुकीच्या पद्धतीने ठराव पास केलेला आहे. हे आमचे मत नोंदवून घ्यायचे आहे. त्याची प्रोसिडींग आम्हांला द्या. नंतर आम्हांला काय करायचे आहे ते आम्ही करु.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ७१ चे वाचन केले.)

(सन्मा. सभागृह नेते श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ७१ चा ठराव सभागृहासमोर मांडला.)

**सुर्यकांत भोईर :-**

प्रकरण क्र. ७१ च्या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, सदर प्रकरण क्र. ७१ चा विषय आणल्यामुळे प्रशासनाला धन्यवाद देतो. हा सर्वात पहिला ज चा प्रस्ताव मी मांडला होता. प्रशासनाला नंतर जाग आली, त्याबद्दल धन्यवाद.

**सुर्यकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, ज च्या प्रस्तावामध्ये मी पहिल्यांदा प्रश्न मांडलेला होता.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. ७१ :-**

राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ दहिसर चेक नाका ते वर्सोवा ब्रीज पर्यंत (CH ४३९.०० km ते CH ५०२ km) रस्त्यालगत दोन्ही बाजूतील सर्व्हीस रोड महानगरपालिकेच्या ताब्यात हस्तांतर करुन घेणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ७५ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत राष्ट्रीय महामार्ग क्रं. ८ वरील दहिसर चेक नाका ते काशिमिरा नाका व पुढे वर्सोवा नाक्या पर्यत मुख्य रस्ता व दोन्ही बाजूतील सर्व्हीस रोड भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या ताब्यात आहे. सदर मुख्य रस्त्यालगत असलेले सर्व्हीस रोड महानगरपालिकेकडे हस्तांतर करून घेवुन विकसित करण्याकरीता लोकप्रतिनिधी कडून मागणी होत आहे. प्रशासनामार्फत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्याकडे हस्तांतराबाबत वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांनी मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे रस्ते हस्तांतर न करता सर्व्हीस रोड देखभाल दुरुस्ती तसेच पूर्व परवानगी घेवुन सुशोभित व विकसित करण्याकरीता करारनामा करून देण्याबाबत पत्र देवुन तयारी दर्शविलेली आहे. सदर रस्ता महानगरपालिकेच्या ताब्यात हस्तांतर केल्यास मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूस आर.सी.सी. नाले फुटपाथ बांधून सुशोभिकरण करणे तसेच सर्व्हीस रोड चे मजबूतीकरण डांबरीकरण करणे ही कामे महानगरपालिकेस पुढील अर्थसंकल्पात तरतुद करून हाती घेता येतील.

वरील प्रस्ताव पाहता सदर सर्व्हीस रोड भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्याशी करारनामा करून अटीशर्तीवर विकसित करणे कामास मान्यता देण्यात येत आहे. ठाणे, नाशिक, मुंबई महानगरपालिकांनी अशाप्रकारे सर्व्हीस रोड स्वतः तयार केलेले आहेत. आयुक्त यांनी सदर प्राधिकरणाशी पत्रव्यवहार करुन महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या अटीशर्ती ठेवून करारनामा करण्यात यावा असा ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मिलन म्हात्रे :-**

आपल्याला ॲन्टी चेंबरमध्ये बोलावून प्रश्न मागे घ्यायला लावला हे पण बोला ना.

**सुर्यकांत भोईर :-**

हा प्रश्न पहिला मी मांडलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ॲन्टीचेंबरमध्ये आपल्याला प्रश्न मागे घ्यायला लावला आणि मग मी मांडला हे पण बोला.

**मा. महापौर :-**

सचिवजी पुढच्या विषयाला सुरुवात करावी.

**प्र. सचिव :-**

प्रकरण क्र. ७२, सन्मा. सदस्य ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल ह्यांनी दि. ०९/१२/२००५ रोजी ज च्या प्रस्तावाखाली प्रश्न विचारला होता. ते रजेवर असल्यामुळे हादेखील प्रश्न आपोआप संपुष्टात आलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, दुःखवटा प्रस्ताव मांडायचा आहे. गेल्या महिन्यात माजी अर्थमंत्री व नियोजन समितीचे उपाध्यक्ष व राजकीय कामकाजाशी संबंधित व्यक्ती मधु दंडवते दिवंगत झाल्याने आपल्याला यापुढे या थोर पुढाऱ्याचे कोणत्याही प्रकारचे सहकार्य लाभणार नाही आणि आपण त्यांना मुकलेले आहोत. त्याबद्दल

मी सभागृहात शोकप्रस्ताव मांडत आहे. त्याचबरोबर अभिनय क्षेत्रातील सुधीर जोशी या कलाकाराचे निधन झाले आहे. त्यांचाही शोकप्रस्ताव मी सभेसमोर मांडत आहे.

**नयना म्हात्रे :-**

सदर शोकप्रस्तावाला माझे अनुमोदन आहे.

**दुःखवटा ठराव क्र. ७६ :-**

माजी अर्थमंत्री व नियोजन समितीचे उपाध्यक्ष व राजकीय कामकाजाशी संबंधित व्यक्ती मधु दंडवते त्याचप्रमाणे अभिनय क्षेत्रातील सुधीर जोशी ह्यांचे निधन झाले आहे. तरी या सर्व मृतात्म्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात ही महासभा सहभागी आहे. देव त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे.** **अनुमोदन :- श्रीम. नयना म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सर्व सन्मा. सदस्यांनी दोन मिनिटाकरिता सभागृहामध्ये शांतता पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यांत आली.)

**मा. महापौर :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे मी जाहिर करित आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ०१.०० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**